नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८५ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. १२ जून २०२६


मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# पुण्यातील कॉक्रोच रस्त्यावर

## मीम्स, फलक, घोषणा आणि निर्धारही; च्या पुण्यातील आंदोलनाचे अनोखे चित्र !

पुणे : (स. गांवकरी)

'कटिंग चहा स्ट्राँग मिळतो. पण, व्यवस्था स्ट्राँग नाही', 'पेपर फुटले ७९, जीव गेले ८, राजीनामे झाले ०', 'टाइमपास नव्हता तो, आपल्या आयुष्यातला महत्त्वाचा पेपर होता तो'... शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे मीम्स, फलक, घोषणा आणि वेगवेगळ्या परीक्षांमध्ये नशीब आजमावू पाहणारे विद्यार्थी. त्यांना पाठिंबा द्यायला आलेले पालक-शिक्षक. कॉक्रोच जनता पार्टीच्या देशव्यापी आंदोलनाचा प्रारंभ गुरुवारी अशा वातावरणात झाला. एरवी, समाजमाध्यमांवर स्टोरी, स्टेटस आणि पोस्टच्या माध्यमांतून व्यक्त होणारी तरुणाई पेपरफुटीवरून सरकारला जाब विचारत असल्याचे चित्र गुरुवारी विद्यापीठात दिसले. शिक्षण व्यवस्थेत बदलांच्या अपेक्षेने वेगवेगळ्या भागांतील विद्यार्थांनी या आंदोलनात भाग घेतला. आंदोलनाचा चेहरा म्हणून जेन-झी समाजमाध्यमांवर पुढे येत होते, तर आंदोलनाची व्यवस्था मात्र चळवळीतल्या जुन्या कार्यकर्त्यांनी पार पाडली. 'नौजवान भारत सभा', 'राष्ट्र सेवा दल', 'महाराष्ट्र विद्यार्थी संघटना' आणि 'एसएफआय' यांसारख्या डाव्या आणि पुरोगामी संघटना आंदोलनात सहभागी




झाल्या. तर, शिक्षण-पर्यावरणाचा विचार मांडण्यासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक थेट लडाखवरून दाखल झाले. ॲड. असीम सरोदे, डॉ. विश्वंभर चौधरी, नामदेव जाधव आदीही या वेळी उपस्थित होते.

'शिक्षणात आज मोठ्या प्रमाणावर अंधार दिसतो. आता तर परीक्षांमध्येही घोटाळे होत आहेत. त्यासाठी व्यवस्थेला जबाबदार धरलेच पाहिजे. सरकारने याची जबाबदारी घेतली पाहिजे. शिक्षण आणि पर्यावरण हेच आपले मुद्दे आहेत. स्वच्छ पाणी, हवा हा आपला अधिकार आहे. त्यासाठी सत्याच्या मार्गाने लढा द्यायचा आहे. अहिंसक मार्गाने आंदोलन पुढे गेले, तर मोठा बदल होण्याची शक्यता आहे,' असे वांगचुक यांनी सांगितले.

'पेपर फुटले, विद्यार्थी मेले. पण, कोणी राजीनामा द्यायला तयार नाही. देशाच्या विश्वगुरूंना एक प्रश्न आहे, 'तुमच्यासाठी एक कोटी विद्यार्थी महत्त्वाचे, की एक मंत्री?' गेल्या दहा-बारा वर्षांपासून देशात फक्त हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण सुरू आहे. आपण विचार करणे बंद केले आहे. नोकरी, महागाईचा विचारही नाही,' असे दिपके म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉक्रोच जनता पक्षावर केलेल्या टिकेला अभिजीत दिपके यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना फॉलो करणारे, 'जय भीम'च्या घोषणा देणारे, अराजकवादी आहेत का? तुम्ही म्हणता राज्यघटना फक्त आमच्या हातात आहे. पण, तुम्हीच सांगा, राज्यघटनेत पहाटे पाच वाजता शपथ घ्यावी, असे कुठे लिहिले होते? विरोध करणाऱ्यांना पाकिस्तानी म्हणता, मग फक्त 'भाजप'वालेच भारतीय आहेत का? या देशातील युवक तुमच्या राजकारणाला कंटाळला आहे. जिथे सडलेली जागा असते, तिथेच कॉक्रोच येतात. आता सिस्टीम सडली आहे, म्हणून कॉक्रोच रस्त्यावर आले आहेत.'

### विद्यार्थ्यांचा जाहीरनामा

- पेपर फुटल्यास, निकालाला उशिरा झाल्यास प्रत्येक बाधित विद्यार्थ्याला १० हजार रुपये थेट भरपाई.
- परीक्षा पुढे ढकलल्यास विद्यार्थ्यांचा राहण्या-खाण्याचा खर्च, मानसिक त्रासाची भरपाई म्हणून १० हजार रुपये.
- वेगवेगळ्या भरती परीक्षांवेळी विशेष रेल्वे आणि एसटी गाड्या.
- परीक्षा अचानक रद्द केली, तर ७२ तासांच्या आत नवीन तारीख.
- ऑन-स्क्रीन मार्किंग रद्द करावे.
- परीक्षेला उशीर होणार असल्यास विद्यार्थ्यांना वयोमर्यादेत सवलत.
- कोणत्याही ऑनलाइन परीक्षेच्या सात दिवस आधी संगणकीय यंत्रणेचे त्रयस्थ संस्थेकडून परीक्षण.
- 'एनसीईआरटी'च्या पुस्तकातून वगळलेला मराठा साम्राज्याचा नकाशा परत समाविष्ट करा.

# पक्षात कुणाचाही हस्तक्षेप खपवून घेणार नाही : सुनेत्रा पवार

मुंबई : (स. गांवकरी)

'मी पक्षाची सुत्रे स्वीकारल्यापसून बरेच काही घडले. पण, मी ते समजून घेतले. यापुढे पक्षात कुणाचाही हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही. पक्षहिताला माझे सर्वोच्च प्राधान्य राहील. मला कठोर निर्णय घ्यायला भाग पाडू नका, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षातील बुजुर्ग नेत्यांना सज्जड दम दिला. राष्ट्रवादीचा २७ वा वर्धापन दिन पार पडला. अजित पवार यांच्या निधनानंतरचा पक्षाचा पहिलाच वर्धापन दिन होता. त्यामुळे सुनेत्रा यांच्या भाषणाकडे सर्वांचे लक्ष होते. त्या भाषणाला उभा राहताच, वहिनीसाहेब... वहिनीसाहेब.... या घोषणांना सभागृह दणाणून गेले. अजित पवार अमर रहे, अशा घोषणा दिल्या जात होत्या. अजित पवार यांच्या आठवणी सांगताना सुनेत्रा पवार यांचा भाषणामध्ये अनेकदा कंठ दाटून आला. अनेकदा काही सेकंद त्या बोलू शकल्या नाहीत. माझ्यावर आलेल्या जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव आहे. कार्यकर्त्यांची निष्ठा लक्षा घेवून त्याला संधी मिळेल. अजित पवार यांनी अनेकांचे हट्ट पुरवले. अनेकांना मोठी पदे दिली. समजूनही घेतले. पण, मी पक्षहिताला सर्वोच्च प्राधान्य देईन. ज्येष्ठांचा आणि महिलांचा पक्षात सन्मान राखला जाईल. पण, पक्षात कुणाचाही हस्तक्षेप चालणार नाही, असे सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले. यावेळी



व्यासपीठावरील नेत्यांचे चेहरे पाहण्यासारखे झाले होते. सुनेत्रा पवार यांचे संपूर्ण भाषण लिखीत होते. पण, पक्षातील हस्तक्षेपाच्या मुद्याबाबत बोलताना त्यांनी लिखीत भाषणा बाजूला ठेवले. हा मुद्दा मांडच असताना सभागृहात शांतता होती. गेले काही दिवस पार्थ पवार विरुद्ध प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ अशा नेतेमंडळींमध्ये वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी कठोर निर्णय घेण्यास भाग पाडू नये हा दिलेला इशारा बोलका ठरतो. किती काळ पक्षात काम केले याला महत्व नाही. तुम्ही पक्षाला किती पुढे नेले यावर तुमचे पक्षातील स्थान ठरेल. लवकरच महामंडळाचे वाटप होणार आहे. त्यावेळी चर्चा करुन नियुक्त्या होतील. त्यामध्ये निष्ठावंतांना संधी दिली जाईल. अल्पसंख्याक, दलित, आदिवासी यांच्या सुरक्षिततेला पक्षाचे प्राधान्य राहील. जात व धर्माच्या व्देषाला पक्षात थारा नाही. महाराष्ट्रधर्माची लढाई पक्ष निष्ठेने लढेल. राजकीय तडजोड करणार नाही. शहरी भागाकडेही आता लक्ष द्या. पक्ष संघटना मजबूत करा. पक्षाकडून वेळोवेळी कार्यक्रम दिले जातील, अशा सूचना सुनेत्रा पवार यांनी दिल्या.

## थोडक्यात...



### भरपाई देण्यासाठी लाचेची मागणी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राष्ट्रीय महामार्गासाठी झालेल्या भूसंपादनाच्या नुकसान भरपाईची मंजूर झालेली रक्कम मिळवून देण्यासाठी १ लाख २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या श्रीगोंदे-पारनेर उपविभागीय कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील एका कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे तर दुसरा कर्मचारी फरार आहे. श्रीगोंदे-पारनेर उपविभागीय कार्यालय अहिल्यानगर शहरात, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आहे. तेथील महसूल सहाय्यक मंगेश विजय ढुमणे व कंत्राटी कर्मचारी अमोल कानिफनाथ खामकर या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ढुमणे याला अटक करण्यात आल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी दिली.


### वर्षभरानंतरही शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत

अलिबाग (स. गांवकरी) : रायगड जिल्ह्यात एप्रिल आणि मे २०२५ मध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे शेती आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. तब्बल २,४८४ हेक्टर क्षेत्रावरील पिके आणि फळबागा बाधित झाल्या असून ६,५७८ शेतकऱ्यांना फटका बसला होता. मात्र, नुकसान होऊन वर्ष उलटले तरी अनेक शेतकरी अद्याप भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत. जिल्हा प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाकडे १ कोटी १० लाख रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव पाठविला आहे. मात्र अद्याप निधी मंजूर न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. बदलत्या हवामानामुळे शेती व्यवसाय दिवसेंदिवस अधिक जोखमीचा बनत चालला आहे. अवेळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होत आहे. "निसर्ग जगू देत नाही आणि शासनाची मदत वेळेवर मिळत नाही," अशी भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मे २०२६ मध्येही अवेळी पावसाने रायगड जिल्ह्यात हजेरी लावून घरे, फळबागा आणि शेतीचे नुकसान केले आहे.

# काशिद समुद्र किनाऱ्यावर जळगाव येथील पर्यटकाचा बडून मृत्यू

अलिबाग : (स. गांवकरी)

काशिद समुद्र किनाऱ्यावर जळगाव येथून पर्यटनासाठी आलेले दोन पर्यटक बुडाले. यातील एकाला वाचविण्यात यश आले असले तरी दुसऱ्याचा मात्र मृत्यू झाला. मिळालेल्या महितीनुसार इम्रान खान वय ३७, अमीन शेख वय २५ आणि मलिक शेख २१ हे तिघे कासोरा तालुका एरंडोल जिल्हा जळगाव येथून रायगड जिल्ह्यात ताडपत्री व्यवसायासाठी आले होते. मोकळ्या वेळेत तिघेही काशिद समुद्र किनाऱ्यावर सहलीसाठी गेले होते. समुद्रस्नानाचा आनंद लुटण्यासाठी तिघेही पाण्यात उतरले. पण अमीन शेख आणि मलिक शेख यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस कर्मचार रोटकर, जीवरक्षक मयुरेश बलकावडे आणि अरफाज सौदागर यांनी मदत व बचाव कार्य सुरू केले. रोबोटीक वॉटर क्राफ्टच्या मदतीने दोघांचा शोध घेण्यात आला. मलिक शेख यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात बचाव पथकांना यश आले. पण अमीन शेख यांचा बुडून मृत्यू झाला. मलिक शेख यांना नांदगाव येथील आयुष रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थीर आहे. तर अमीन शेख यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मुरुड येथील ग्रामिण रुग्णालयात आणण्यात आला आहे. पोलीसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. गेल्या दीड महिन्यात काशिद येथे पर्यटक बुडण्याची ही तिसरी घटना आहे. त्यामुळे पोलीसांनी काशिद समुद्र किनाऱ्यावर समुद्र स्नान करतांना योग्यती खबरदारी बाळगण्याचे आवाहन केले आहे.



■ जीवरक्षकांच्या मदतीने एकाला वाचवण्यात यश, तर एकाचा दुर्दैवी अंत

# गोकुळ गितेंच्या माघारीमागे दबावतंत्र?

नाशिक : (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या नाशिक मतदारसंघात गोकुळ गिते यांच्या माघारीचा संबंध त्यांचे बंधू भाजपचे माजी स्थायी सभापती गणेश गिते यांचा म्हाडा प्रकरणात दाखल गुन्ह्यात जामीन रद्द करण्यासाठी झालेल्या कथित पत्र व्यवहाराशी जोडला गेला. या संदर्भात उपस्थित झालेल्या प्रश्नावर मंत्री गिरीश महाजन यांनी सारवासारव केली. म्हाडा (गृहनिर्माण घोटाळा) प्रकरणात केवळ गिते यांचे नाव नसून अनेकांची नावे आहेत. तो विषय इतका मोठा नाही की, त्यामुळे नोटिसीला घाबरून गोकुळ गिते हे माघार घेतील, असे त्यांनी सूचित केले. विधान परिषदेच्या नाशिक मतदारसंघात अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी चर्चेअंती रिंगणातून माघार घेतल्याचे गिरीश महाजन, उदय सामंत व दादा भुसे या मंत्र्यांच्या एकत्रित पत्रकार परिषदेत जाहीर केले. काल-परवापर्यंत गोकुळ हे कुठल्याही परिस्थितीत माघार घेणार नसल्याचे सांगत होते. त्यांनी अकस्मात माघार घेण्यामागे दबाव तंत्राचा अवलंब असल्याचे आरोप होत आहेत. मंत्री महाजन आणि सामंत यांनी ते नाकारले. या निवडणुकीत माजी स्थायी सभापती गणेश गिते आणि त्यांचे



बंधू गोकूळ या दोघांनी अर्ज भरले होते. मंत्री महाजन यांच्या सूचनेनंतर गणेश गिते यांनी रिंगणातून माघार घेतली. परंतु, गोकुळ यांची उमेदवारी कायम होती. अर्ज भरण्याच्या काळात गणेश गिते यांच्यावर दाखल गुन्ह्यात जामीन रद्द व्हावा, यासाठी न्यायालयाशी काही पत्रव्यवहार झाल्याचे सांगितले जात होते. मध्यंतरी मंत्री सामंत यांनी ही बाब नाकारली होती. कोणाला जाणीवपूर्वक त्रास देण्याची आमच्या पक्षाची संस्कृती नसल्याचे त्यांनी म्हटले होते. गुरूवारी या संदर्भात मंत्री महाजन यांच्याकडे विचारणा झाली असताना त्यांनीही या प्रकारे दबावतंत्राची बाब फेटाळली. म्हाडाचा विषय न्यायप्रविष्ठ असून माघारीशी त्याचा संबंध जोडू नये, असे मंत्री महाजन यांनी स्पष्ट केले. म्हाडा प्रकरणात केवळ गिते नाही तर अनेकांची नावे आहेत. तो विषय इतका मोठा नाही. नोटिसीला घाबरून माघार घेणारे गिते नाहीत, असे त्यांनी सूचित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाल्यानंतर गिते यांनी माघार घेतली, असा दावा महाजन यांनी केला. शासनाच्या सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत नाशिक महापालिका क्षेत्रातील चार हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकाम असलेल्या गृह प्रकल्पात २० टक्के सदनिका आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. ही घरे बांधून ती म्हाडाकडे वर्ग करावी लागतात. विकासकांनी म्हाडाला ही घरेच दिली नाहीत.

अशा ४९ प्रकरणात विकासक आणि जागा मालक अशा जवळपास १९७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. संशयितांनी भूमी अभिलेख कार्यालयाची बनावट स्वाक्षरी, शिक्के, नकाशे, आकार फोड पत्रक (अर्ज क्रमांक १२) अशी कागदपत्रे खरी असल्याचे भासवत जमिनीचे तुकडे करत शासनाची फसवणूक केल्याचे हे प्रकरण आहे. यातील संशयितात गणेश गिते यांचे नाव आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर दिनेश उर्फ सोनू मनवाणी आणि दीपक करमचंदांनी या बांधकाम व्यावसायिकांना अटक झाली. अटक टाळण्यासाठी अनेक बड्या संशयितांनी उच्च न्यायालयात धाव घेतली.

**म्हाडा प्रकरणावरून महाजनांची सारवासारव**

# भाजपची अजित पवार गटावर कुरघोडी

## पणन महासंघाच्या अध्यक्षांवर अविश्वास प्रस्ताव संमत

मुंबई : (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांना आव्हान देणारे राष्ट्रवादीचे दत्तात्रय पानसरे यांना गुरुवारी सहकारी पणन महासंघाच्या अध्यक्षपदावरून हटविण्यात आले. महासंघाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पानसरे यांच्यावर अविश्वास प्रस्ताव संमत करण्यात आला.

पणनमंत्री जयकुमार रावळ यांचा महासंघातील वाढता हस्तक्षेप आणि संचालक मंडळाची केली जाणारी कोंडी याला वैतागून आपणच अविश्वास प्रस्ताव संमत करण्याची विनंती संचालकांना केल्याचा दावा पानसरे यांनी केला.

उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचे खंद्दे समर्थक असलेले पानसरे गेले दीड वर्षे पणन महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. मात्र पणनमंत्री रावळ आणि पानसरे यांच्यातील सत्तासंघर्ष गेल्या काही महिन्यात विकोपास गेला होता. त्यातच पानसरे यांनी विधानपरिषदेच्या अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उभे राहत भाजपाचे अधिकृत उमेदवार प्राजक्त तणपुरे यांच्यासमोर आव्हान उभे केले होते. मात्र उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी नाट्यमय घडामोडीत खोटी सही करुन आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आल्याचा आरोप पानसरे यांनी केला. शेवटी भाजप नेत्यांच्या हस्तक्षेपानंतर पानसरे यांना निवडणुकीतून माघार घेण्यास भाग पाडण्यात आले. अहिल्यानमध्ये रंगलेल्या या राजकीय वादाची परिणती पानसरे यांच्यावरील अविश्वास ठरावात झाली.

पणन संघातील पानसरे आणि रावळ यांच्या वादातून संचालक मंडळाचे अधिकार कमी करण्यात आले.तसेच संघाच्या चौकशीचे आदेशही रावळ यांनी दिले होते. यातून अस्वस्थ झालेल्या संचालक मंडळाने आज अविश्वास प्रस्तावाच्या माध्यमातून पानसरे यांनाच महासंघातून दूर केले आहे. याबाबत पानसरे यांच्याशी संपर्क साधला असता, आपल्याला हटविण्यासाठी पणनमंत्री सातत्याने प्रयत्नशील होते.





# थोडक्यात पण महत्वाचे



## भिवंडीतील जय भगवान गोदाम संकुलात पेपर रोल गोदामला आग

- आगीत लाखोंचे नुकसान; सुदैवाने जिवीत हानी नाही.

भिवंडी (स. गांवकरी) : मुंबई नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील वाहुली गावाच्या हद्दीत असणाऱ्या जय भगवान गोदाम संकुलातील पेपर रोल गोदामला लागलेल्या भिषण आगीत 9 गोदाम जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. आग लागण्याचे निश्चित कारण समोर आले नसले तरी आगीत लाखों रुपयांचा साहित्य जळून खाक झाले आहे सुदैवाने जिवीत हानी झाली नाही. वाहुली येथील जय भगवान कदम संकुलातील पेपर रोलचा साठा असणाऱ्या गोदामाला दुपारच्या सुमारास अचानक आग लागल्याने एकच धावपळ उडाली होती तर यावेळी आगीचे डोंब चे डोंब बाहेर पडत आगीच्या ज्वाला भडकल्याने एकच खळबळ उडाली होती. आग आटोक्यात आणण्यासाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांसह खाजगी गाड्या आणि टँकरने पाणीपुरवठा करून आग नियंत्रण आणण्यासाठी अग्निशामक दलाचे जवान शर्तीचे प्रयत्न करीत आहेत. तर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून स्थानिक पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते.

## आ. अमोल खताळ यांची खामुंडीच्या श्री काळभैरवनाथ देवस्थानाला भेट



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ यांनी जुन्नरतालुक्यातील खामुंडी येथे श्री काळभैरवनाथ देवस्थानाला सदिच्छा भेट दिली या भेटीदरम्यान देवस्थान ट्रस्ट व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचाशाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. श्री काळभैरवनाथाचे दर्शन घेतल्यानंतर आमदार खताळ यांनी मंदिर परिसराची पाहणी केली.त्यांनी देवस्थानच्याविकास कामांबाबत ट्रस्ट पदाधिकाऱ्यां कडून माहिती जाणून घेतली. भेटीदरम्यान उपस्थित भाविकांशी त्यांनी संवाद साधत गावाच्या समस्या ऐकून घेतल्या. यावेळी बोलताना आमदार खताळ म्हणाले,"खामुंडीचे श्री काळभैरवनाथ देवस्थान हे जुन्नर परिसरातील श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्र आहे.ग्रामस्थांनी एकत्र येऊन देवस्थानची जोपासना करणे हीच खरी भक्ती आहे." या वेळी देवस्थान ट्रस्टचे खजिनदार मारुती कदम , विश्वस्त अरुण बोडके,गणपत कोकाटे,शहाजी जाधव, व्यवस्थापक बबन डुंबरे सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके,केशव क्षीरसागर, सह्याद्री करिअर अकॅडमीचे मयुर डुंबरे चंद्रकांत (लालू ) महाले, शिवसेना शिंदे गटाचे संगमनेर तालुका अध्यक्ष रमेश काळे आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. गावात आलेल्या लोकप्रतिनिधीचा सन्मान करण्याची स्थानिक परंपरा यानिमित्ताने पुन्हा एकदा दिसून आलीजुन्नर तालुक्यातील खामुंडी येथील श्री काळ भैरवनाथ मंदिर भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे . आमदारांच्या या भेटीने गावात उत्साहाचे वातावरण होते.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची खासदार रामराव वडकुते यांनी घेतली सदिच्छा भेट



हिंगोली (स. गांवकरी) : नुकतेच राज्यसभा सदस्यपदी बिनविरोध निवडून आलेले भाजपाचे खासदार रामराव वडकुते यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात भारताच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची सहपरिवार सदिच्छा भेट घेतली. या शिष्टाचार भेटीदरम्यान खासदार रामराव वडकुते यांच्यासोबत त्यांच्या पत्नी इंदुताई रामराव वडकुते, शशिकांत वडकुते आणि दिलीप वडकुते उपस्थित होते. या भेटीदरम्यान खासदार वडकुते यांनी महामहिम राष्ट्रपतींशी सविस्तर संवाद साधला. या प्रसंगी प्रामुख्याने मराठवाडा परिसर तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार रामराव वडकुते म्हणाले की,विकसित महाराष्ट्र आणि 'विकसित भारत' घडवण्यासाठीच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये आदरणीय राष्ट्रपतींचे मोलाचे मार्गदर्शन, अफाट ज्ञान आणि दूरदृष्टी आम्हांला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व शुभेच्छांबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या प्रेरणेतून जनकल्याण, विकास आणि राष्ट्रनिर्माणासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर खासदार रामराव वडकुते यांनी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही सहकुटुंब सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी विविध राजकीय व सामाजिक विषयांवर चर्चा झाली.

# काळुस्ते आश्रमशाळेतील कथित गैरप्रकारांवरून संताप

- दोषींवर कारवाई न झाल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा!
- काळुस्ते आश्रमशाळेतील भ्रष्टाचाराचा ३५६ पानी अहवाल मुख्यमंत्र्यांकडे देणार – डॉ. विश्वासराव आरोटे
- दोषींवर कारवाई झाल्याशिवाय माघार नाही; काळुस्ते प्रकरणी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा – डॉ. विश्वासराव आरोटे




(स. गांवकरी)

आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील काळुस्ते आश्रमशाळेतील कथित गैरव्यवहार, शिक्षक व विद्यार्थ्यांवरील अन्याय, आर्थिक अनियमितता तसेच मुख्याध्यापकांच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने तीव्र भूमिका घेतली आहे. या प्रकरणात तात्काळ आणि निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात काळुस्ते आश्रमशाळेतील कारभारावर गंभीर आरोप केले आहेत. अनेक वर्षांपासून शाळेत शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे सांगत संबंधित मुख्याध्यापकांविरोधात अनेक तक्रारी, चौकशी अहवाल आणि समित्यांचे निरीक्षण अहवाल उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे.

आरोटे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, अनेक तक्रारी, सावित्री समितीसह विविध चौकशी समित्यांचे अहवाल आणि निरीक्षणे असूनही संबंधित मुख्याध्यापकावर अद्याप कारवाई का झाली नाही? आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय आणि वरिष्ठ प्रशासन याबाबत मौन का बाळगत आहे? किती शिक्षक, कर्मचारी किंवा विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यानंतर प्रशासन जागे होणार आहे, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

या मुख्याध्यापकांनी यापूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातही सेवा बजावली असून त्यांच्या कारभारासंदर्भात ३५६ पानी सविस्तर अहवाल तयार करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या अहवालामध्ये कथित भ्रष्टाचार, शिक्षकांवरील दबाव, बदली प्रकरणे, धमक्या, प्रशासकीय गैरव्यवहार तसेच आर्थिक अनियमिततेसंबंधी माहिती समाविष्ट असल्याचे सांगण्यात आले. हा अहवाल लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शाळेतील वातावरण भयग्रस्त बनले असून अनेक शिक्षक, कर्मचारी आणि काही विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला आहे. जीवे मारण्याच्या धमक्या देणे, "करेक्ट कार्यक्रम करतो" अशा भाषेचा वापर करणे, विरोधकांना लक्ष्य करणे अशा प्रकारच्या तक्रारी सातत्याने पुढे येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमागेही दबावाचे राजकारण असल्याचा दावा करण्यात आला.

विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणामागे काही राजकीय शक्तींचे संरक्षण असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आमदार हिरामण खोसकर यांच्या विरोधकांना खूश करण्यासाठी काही मंडळींकडून हा कारभार सुरू असल्याची चर्चा परिसरात होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची राजकीय अंगानेही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

डॉ. आरोटे यांनी काळुस्ते आश्रमशाळेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक भ्रष्टाचार झाल्याचाही गंभीर आरोप केला आहे. शाळेच्या साहित्य खरेदीमध्ये एकाच किराणा दुकानाच्या नावाने बनावट बिले सादर करण्यात आली असून प्रत्यक्षात साहित्य पुरवठा झाला नसल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या माध्यमातून ३० ते ४० कोटी रुपयांपर्यंतचा भ्रष्टाचार झाल्याचा दावा करण्यात आला असून यासंदर्भातील कागदपत्रे आणि पुरावे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणात आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, नाशिक विभागाचे अपर आयुक्त पावरा, आदिवासी समाजाचे ज्येष्ठ नेते डॉ. शरद तळपाडे, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, रंजना गवांदे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते नाटे यांनी देखील या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना शिक्षा देण्याची आवश्यकता व्यक्त केली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने स्पष्ट इशारा दिला आहे की, जोपर्यंत काळुस्ते आश्रमशाळेतील कथित गैरप्रकारांची निष्पक्ष चौकशी होत नाही आणि दोषींवर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत हा लढा सुरू राहणार आहे. यासाठी लवकरच मुंबईतील आझाद मैदानावर मोठे आंदोलन छेडण्यात येणार असून आदिवासी विकास विभागांतर्गत चालणाऱ्या इतर आश्रमशाळांमधील कारभाराचाही पर्दाफाश करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासन कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करत असताना प्रत्यक्षात त्या निधीचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतो का, हा प्रश्न या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे. काळुस्ते आश्रमशाळेतील प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी आता विविध स्तरांतून जोर धरू लागली आहे.

## उंब्रजच्या ऑक्सिजन पार्कमध्ये दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन



जुन्नर तालुका: (स. गांवकरी)


आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटनेने'अत्यंत संकटग्रस्त 'म्हणून घोषित केलेल्या सोनघंटा व दहीमन या दुर्मीळ वनस्पतींसह अनेक वनस्पतींचे उंब्रज नं:-२ ता:- जुन्नर येथील 'ऑक्सिजन पार्क'मध्ये संवर्धन करण्यात येत आहे. राष्ट्रीय स्थायी विकास संस्था (NISD) इंडिगो एअरलाईन्स व अफार्म पुणे आणि ग्रामपंचायत उंब्रज यांच्या संयुक्त विद्यमाने गावच्या गायरानात राष्ट्रीय विकास संस्था जुन्नर तालुक्यातील प्रकल्प अधिकारी विजयकुमार शिंदे यांनी देशी वृक्षाबरोबर दुर्मीळ वनस्पतींच्या संवर्धनासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यांनी दुर्मीळ वनस्पतींची रोपे मिळवून त्यांचे संवर्धन करण्याचे कार्य हाती घेतले आहे.

उंब्रज गावालगत गायरान विभागाच्या दोन एकर क्षेत्रात ऑक्सिजन पार्क हा महत्त्व कांक्षी प्रकल्प साकारत आहे. येथे गेली दोन वर्षभर झाडांची जोपासना करून ती वाढविण्या साठी प्रयत्न करत आहे यासाठी त्यांनी जलवाहिनीतून होणाऱ्या गळतीचे पाणी यातसाठविण्यात येते. त्यानंतर हे पाणी ड्रीप ने झाडांना देण्यात येते.

## विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळेना

- 'टायगर ग्रुप'चा पनवेलमधील एसपी इन्स्टिट्यूटला दणका!
- शालेय व्यवस्थापनाला विचारला जाब; ८ दिवसांत प्रश्न मार्गी लावण्याचे कॉलेजचे आश्वासन

पनवेल : (स. गांवकरी)



येथील नामांकित 'एसपी एज्युकेशनल इन्स्टिट्यूट' चा एक धक्कादायक कारभार समोर आला आहे. कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी तब्बल १,६०,०००/- (एक लाख साठ हजार रुपये) एवढी मोठी फी भरूनही त्यांना अद्याप रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट देण्यात आलेले नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी चाललेल्या या खेळामुळे संतप्त झालेल्या 'टायगर ग्रुप'ने कॉलेज प्रशासनाला थेट जाब विचारत दणका दिला आहे.

टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी जाधव आणि संस्थापक वस्ताद जालिंदर जाधव यांच्या आदेशानुसार, तसेच टायगर ग्रुप पनवेलचे अध्यक्ष शंकर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली टायगर ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी आज थेट एसपी एज्युकेशनल इन्स्टिट्यूट गाठले. विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट का रखडले आहे, याबाबत टायगर ग्रुप पनवेलचे अध्यक्ष शंकर जाधव यांनी शालेय व्यवस्थापनाच्या प्रतिनिधी श्री. वर्षा मॅडम यांना धारेवर धरले. भरमसाठ फी वसूल करूनही विद्यार्थ्यांना हक्काचे सर्टिफिकेट का दिले जात नाही? विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याला जबाबदार कोण? असे प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आले.

टायगर ग्रुपचा आक्रमक पवित्रा आणि विद्यार्थ्यांची झालेली कोंडी पाहून अखेर शालेय व्यवस्थापनाने नमती भूमिका घेतली. व्यवस्थापनाच्या वतीने वर्षा मॅडम यांनी शंकर जाधव यांना स्पष्ट आश्वासन दिले की, "येत्या आठ दिवसांच्या आत आम्ही तुम्हाला दिलेला शब्द पूर्ण करू आणि विद्यार्थ्यांचा हा प्रलंबित प्रश्न पूर्णपणे मार्गी लावू." "विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी टायगर ग्रुप नेहमीच तत्पर राहील. जर दिलेल्या ८ दिवसांच्या मुदतीत विद्यार्थ्यांना त्यांचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळाले नाही, तर टायगर ग्रुप स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा शंकरभाऊ जाधव (अध्यक्ष, टायगर ग्रुप पनवेल) यांनी दिला आहे. या धडक कारवाईमुळे पीडित विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी सुटकेचा श्वास सोडला असून टायगर ग्रुपचे आभार मानले आहेत.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विशेष उपक्रम

जुन्नर तालुका (स. गांवकरी)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वनविभाग जुन्नर, चाइल्डफंड इंडिया,ग्रामपंचायत सीतेवाडी,प्रेरणा युथ क्लब सीतेवाडी आणि शीतळेश्वर हायस्कूल सीतेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने "बीजगोळा उपक्रम" आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पर्यावरण संवर्धनाला चालना देणे,हरित क्षेत्र वाढविणे तसेच स्थानिक वृक्षप्रजाती आणि जैवविविधतेच्या महत्त्वा बाबत जनजागृती करणे हा होता.

या उपक्रमामध्ये ११४ बालक, युवक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सुमारे ६०००- बीजगोळ्यांची निर्मिती केली. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृतीतून सहभागी होण्याची संधी या उपक्रमामुळे सर्वांना मिळाली. तसेच वनीकरण, पर्यावरणीय पुनर्स्थापना आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धना बाबतची समज वाढविण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरला. कार्यक्रमास पुणे वनविभागाचे प्रमुख समीर इंगळे तसेच जुन्नर वनविभागाचे प्रमुख रमेश खेरमळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.त्यांनी बीजगोळा तयार करण्याच्या शास्त्रीय पद्धतीबाबत मार्गदर्शन केले आणि बीजगोळ्यांच्या माध्यमातून वनसंवर्धन व जैव विविधता जपण्यामध्ये होणाऱ्या योगदानाविषयी माहिती दिली. त्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करत सर्वांना नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धना साठी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन केले.उपक्रमादरम्यान सहभागी बालक,युवक आणि ग्रामस्थांनी बीजगोळे तयार करण्याची योग्य पद्धत शिकली तसेच वृक्षारोपण व पर्यावरणीय पुनर्स्थापनेमध्ये बीजगोळ्यांची भूमिका समजून घेतली. वन अधिकाऱ्यांनी सहभागींसोबत संवाद साधून पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि जबाबदार नागरिकत्व यांचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी मान्यवरांनी चाइल्डफंड इंडिया कार्यालयालाही भेटदिली या भेटीदरम्यान त्यांना संस्था राबवत असलेल्या बालविकास, युवक सक्षमीकरण,समुदाय सहभाग आणि पर्यावरणीय शाश्वततेसंदर्भातील विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातही अशा संयुक्त उपक्रमांना सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागींनी पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्य करण्याचा आणि हरितनिरोगी व शाश्वत भवितव्य घडविण्यासाठी योगदान देण्याचा सामूहिक संकल्प केला.हा बीजगोळा उपक्रम पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यात, लोकसहभाग वाढविण्यात व निसर्ग संवर्धनासाठी सर्व घटकांची बांधिलकी अधिक दृढ करण्यात यशस्वी ठरला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्ता गिरी यांनी केले,तर आभार प्रदर्शन शहाजी कसबे यांनी व्यक्त केले.

## मुलीने पूर्ण केली आईची हज यात्रेची इच्छा

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

इस्लाम धर्मात हज यात्रेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून प्रत्येक मुस्लिम बांधवाची ती यात्रा करण्याची इच्छा असते. मात्र ही संधी प्रारब्ध आणि अल्लाहच्या कृपेशिवाय प्राप्त होत नाही. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील हाफिज रियाज खान आणि त्यांच्या दिवंगत पत्नी शकिला खान यांचीही हज यात्रा करण्याची इच्छा होती. मात्र, दुर्दैवाने शकिला खान यांचे आजारपणामुळे निधन झाले आणि त्यांची ही इच्छा अपूर्ण राहिली. आईची अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण करण्याचा निर्धार त्यांच्या कन्या तथा श्रीगोंदा येथील पत्रकार मुश्ताक पठाण यांच्या पत्नी हज्जन सौ. सलमा मुश्ताक पठाण यांनी केला. इस्लाममध्ये दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने करण्यात येणाऱ्या हज यात्रेला 'हज्जे बदल' असे म्हटले जाते. सौ. सलमा यांनी आपल्या दिवंगत आईच्या वतीने ही पवित्र यात्रा करण्याचा संकल्प केला. उच्च रक्तदाब आणि मधुमेह यांसारख्या व्याधींना सामोरे जात असतानाही त्यांनी वडील हाफिज रियाज खान यांच्यासमवेत मक्का-मदिना येथे जाऊन ४५ दिवसांच्या कालावधीत हज यात्रा पूर्ण केली. २४ एप्रिल ते ९ जून या कालावधीत मदिना, मक्का तसेच हज यात्रेतील महत्त्वाचे स्थळ असलेल्या मीना येथे वास्तव्यास राहून त्यांनी धार्मिक विधी पूर्ण केले.

# नाशिक तपोवन महानगरीत २० जूनपासून भव्य शिवमहापुराण कथा

- लाखो भाविकांसाठी निवास, महाप्रसाद व विविध सुविधांची जय्यत तयारी!
- नानजीभाई ठक्कर व डॉ. विश्वासराव आरोटे यांची विशेष उपस्थिती!

नाशिक : (स. गांवकरी)





धर्मनगरी नाशिक येथील तपोवन महानगरीमध्ये शनिवार दि. २० जून २०२६ पासून भव्य दिव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून, या ऐतिहासिक धार्मिक सोहळ्याच्या तयारीला अंतिम स्वरूप देण्यात येत आहे. लाखो शिवभक्त आणि भाविक या कथेसाठी उपस्थित राहणार असल्याने आज आयोजनस्थळाची पाहणी करून भाविकांच्या निवास, भोजन, महाप्रसाद, पिण्याचे पाणी, वाहतूक, स्वच्छता आणि सुरक्षा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या संकल्पनेतून आणि धार्मिक सेवाभावातून या भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. समाजात अध्यात्म, संस्कार, धर्मजागृती आणि शिवभक्तीचा प्रसार व्हावा, या उदात्त हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक महोत्सवाला महाराष्ट्रासह देशभरातील शिवभक्त उपस्थित राहणार आहेत.

या शिवमहापुराण कथेचे प्रमुख आकर्षण म्हणजे वृंदावन येथील प्रख्यात आणि देशभरात आपल्या प्रभावी वाणीने शिवभक्तांना मंत्रमुग्ध करणारे पूज्य ब्रिजसिंह महाराज यांचे कथामृत. त्यांच्या मुखातून शिवमहापुराणातील विविध प्रसंग, भगवान महादेवांचे चरित्र, भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि जीवनाला दिशा देणारे अध्यात्मिक संदेश भाविकांना ऐकण्याची संधी मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित पाहणी दौऱ्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, माजी सरपंच सुवर्णाताई ठाकरे, गुजरात समाजाचे अध्यक्ष रामजी पटेल, राजेंद्र पांडे, कांतीराम बोराडे, अनिता आरोटे, रणरागिणी न्यूजच्या संपादिका गायत्री मॅडम यांच्यासह विविध सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक सूचना दिल्या. लाखो भाविकांच्या उपस्थितीचा विचार करून विशाल मंडप, स्वतंत्र निवास व्यवस्था, वाहनतळ, स्वच्छतागृहे, वैद्यकीय सुविधा, पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था तसेच महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ तसेच गुजरात राज्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक येणार असल्याने त्यांच्या मुक्कामाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांना अध्यात्मिक वातावरणात कथा श्रवणाचा आनंद घेता यावा यासाठी संपूर्ण परिसर आकर्षक पद्धतीने सजविण्यात येत असून स्वयंसेवकांची मोठी फौजही कार्यरत आहे. या धार्मिक सोहळ्यात दररोज हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसाद व्यवस्थेसाठी विविध समाजघटक, संस्था आणि दानशूर व्यक्ती पुढाकार घेत आहेत. याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अकोले तालुक्यातील आदिवासी भागातून तांदळाचे योगदान देत महाप्रसाद व्यवस्थेसाठी मोलाचे सहकार्य केले आहे. त्यांच्या या सामाजिक व धार्मिक योगदानाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

शिवमहापुराण कथा ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजात सदाचार, संस्कार, नैतिक मूल्ये आणि मानवतेचा संदेश देणारा एक आध्यात्मिक उत्सव आहे. भगवान शिवांच्या जीवनातील आदर्श, भक्तांचे चरित्र आणि धर्मसंस्कृतीची महती यांचे रसाळ विवेचन या कथेद्वारे होणार असल्याने सर्व स्तरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राज्यभरातील शिवभक्त, धर्मप्रेमी नागरिक आणि भाविकांनी या भव्य शिवमहापुराण कथा सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवकृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# थोडक्यात पण महत्वाचे




## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे केंद्रीय शिक्षण मंत्र्याविरोधात आंदोलन

ठाणे (स. गांवकरी) : देशभरात नीट पेपर फुटी प्रकरण चांगलेच गाजले आहे या पाठोपाठच सीबीएससी पेपर घोटाळा देखील उघडकीस आला असून यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे यात काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या देखील केली याचाच निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पवार यांनी ठाण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन केले. नीट पेपर फुटी प्रकरण सीबीएससी घोटाळा यामुळे देशाची शैक्षणिक प्रतिमा मलीन होत असून यामुळे विद्यार्थ्यांवर देखील परिणाम होत आहे म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला पाहिजे अशी भूमिका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अभिजीत पवार यांनी मांडले या आंदोलनात केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचे हुबेहूब वेशभूषा केलेले प्रति धर्मेंद्र प्रधान यांना चपलांचा हार देखील घालण्यात आला . देशातल्या विद्यार्थ्यांना खेळणं समजलं आहे हा देशातील विद्यार्थ्यांचा अपमान आहे हा अपमान सहन केला जाणार नाही हे सरकार आम्हाला कॉकरोच समजत आहे आता कॉकरोच रस्त्यावर उतरले आहेत कॉकरोच पार्टी ला आमचे समर्थन असल्याचे माध्यमांशी बोलताना अभिजीत पवार यांनी सांगितले.

## स्वस्त धान्य दुकानातील लाभार्थींना धान्य वाटपाची १५ जूनपर्यंत

राजगुरूनगर (स. गांवकरी) : खेड तालुक्यातील रेशनकार्ड लाभार्थींना येत्या १५ जूनपर्यंत मे व जून महिन्याचे मोफत धान्य उपलब्ध होणार असून, त्यानंतर धान्याचे वाटप करता येणार नसल्याची माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी मुदतीपूर्वी स्वस्त धान्य दुकानातून धान्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. शासननिर्णयानुसार रेशनकार्डधारकांना एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांचे धान्य एकाचवेळी वितरित करण्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या इंधनटंचाईमुळे वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला आणि धान्य वितरण प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले. आता मे आणि जून महिन्याचे धान्य स्वस्त धान्य दुकानांमध्ये उपलब्ध झाले असून लाभार्थ्यांना दोन महिन्यांचे धान्य घेता येणार आहे. धान्य वितरणासाठी १५ जून ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. १६ जूनपासून ई-पॉस मशीन बंद करण्यात येणार असल्याने त्यानंतर स्वस्त धान्य दुकानदारांना धान्याचे वाटप करता येणार नाही. त्यामुळे सर्व रेशनकार्डधारकांनी तातडीने धान्य उचलावे. खेड तालुक्यात एकूण १९४ स्वस्त धान्य दुकाने असून प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत ६० हजार ६६६ रेशनकार्डधारक आहेत. या लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती दरमहा ३ किलो गहू व २ किलो तांदूळ मोफत दिला जातो. तर अंत्योदय योजनेतील ३२ हजार ५८ रेशनकार्डधारकांना प्रति रेशनकार्ड २२ किलो गहू व १३ किलो तांदूळ मोफत वितरित करण्यात येतो. तालुक्यातील रेशनकार्डावरील एकूण ३ लाख ४ हजार ५९९ लाभार्थ्यांना मोफत धान्याचा लाभ मिळत असल्याची माहिती पुरवठा निरीक्षक महादेव कुंभार यांनी दिली.



## येत्या ४८ तासात सन्माननीय तोडगा काढण्याचे आश्वासन

आळंदी (स. गांवकरी) : श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी रथाला बैलजोडी जुंपण्याची सेवा उमेश रानवडे यांना मिळावी अशी मागणी करीत कमला एकादशी दिनी महाद्वार चौकात उपोषण सुरुवातीस बैलजोडी घेऊन येत त्यांनी उपोषण सुरू केले होते. बैलजोडीची सेवा या वर्षी रानवडे कुटुंबा कडून आहे. यात आलेल्या अर्जातून बैलजोड निवड समितीने हर्षवर्धन रानवडे, तुळशीराम रानवडे यांचे नावे संमती देऊन त्या प्रमाणे पत्र दिले होते. या मुळे उमेश रानवडे यांनी या सेवेची संधी कुटुंबास मिळावी अशी आग्रही मागणी करून उपोषण सुरू केले होते. अखेर चार वाजता बैलजोड निवड समिती अध्यक्ष माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी उपनगराध्यक्ष नंदकुमार कुऱ्हाडे पाटील, विलास घुंडरे पाटील, रामदास भोसले, शिवाजीराव रानवडे, ज्ञानोबा वहिले, माजी अध्यक्ष राहुल चिताळकर पाटील, देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, व्यवस्थापक माऊली वीर, पोलिस नाईक मच्छिंद्र शेंडे यांचे उपस्थितीत संवाद होऊन चर्चा झाली. या वेळी पुढील ४८ तासांत एक बैठक घेण्याचे निर्धारित करून या कालावधीत सन्माननीय तोडगा काढण्याचे आश्वासनावर उमेश रानवडे यांनी आपले उपोषण जलपेय घेऊन मागे घेतले. दरम्यान आळंदीकर ग्रामस्थ बैल जोड निवड समितीने देवस्थान कडून प्राप्त पत्रव्यवहारात आपले पत्र आळंदी पोलिस स्टेशन आणि आळंदी देवस्थान यांना दिले आहे. या बैठकी दरम्यान उमेश रानवडे यांनी आपल्या बेलजोड सेवा पालखी रथास सेवा देण्याची संधी मिळावी अशी मागणी लावून धरत संवाद साधला. यावेळी उपस्थित मान्यवर यांनी सुसंवाद साधून उपोषण शांततेत जलपेय देऊन मागे घेण्यास चर्चेत यशस्वी संवाद साधला.

## अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाची रेकॉर्ड रूम चोरट्याने फोडली

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्हा रुग्णालयातील अत्यंत महत्त्वाची असलेली ‘एमएलसी’ रेकॉर्ड रूम अज्ञात चोरट्याने फोडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी रुग्णालयाचे कनिष्ठ लिपिक कैलास काशिनाथ शिंदे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोराच्या विरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कैलास शिंदे हे जिल्हा रुग्णालयाच्या एमएलसी विभागात काम करतात. रुग्णालयातील व्हिडिओ कॉन्फरन्स आणि सिटी स्कॅन रूमच्या जवळ असलेल्या खोली क्रमांक २८ मध्ये मागील १५ वर्षांचे न्यायालयीन व पोलीस केस संबंधित जुने रेकॉर्ड ठेवण्यात आलेले आहे. ५ जून रोजी सायंकाळी नेहमीप्रमाणे रेकॉर्ड रूम व्यवस्थित कुलूप लावून बंद करण्यात आली होती. त्यानंतर ९ जून रोजी सकाळी शिंदे हे जुने रेकॉर्ड पाहण्यासाठी गेले असता, दरवाजाला आतून कडी लावल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी पाठीमागच्या बाजूला जाऊन पाहिले असता रेकॉर्ड रूमची खिडकी उघडी होती आणि तिचे लोखंडी ग्रील गायब होते. खिडकीतून आत प्रवेश केला असता, खोलीतील सामान अस्ताव्यस्त पडले होते. चोरट्याने खोलीतून वर्ष २०२१ ते २०२२ दरम्यानचे ‘एमएलसी ओपीडी क्ष-किरण’ (एक्स-रे) विभागाचे बांधून ठेवलेले २४ महत्त्वाचे गठ्ठे आणि खिडकीचे लोखंडी ग्रील चोरून नेले.

# राहुरी तहसीलवर आरक्षण बचाव कृती समितीचा भव्य मोर्चा

राहुरी : (स. गांवकरी)



अनुसूचित जाती आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय रद्द करण्यासाठी राहुरी तहसिल कार्यालयावर काल बुधवारी अनुसूचित जाती आरक्षण बचाव कृती समितीच्यावतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

राहुरी शहरातील राजवाडा येथून सकाळी हजारोच्या संख्येने आंबेडकरी समाज बांधव यानिमित्ताने एकवटलेला दिसून आला. मोर्चाच्या सुरुवातीला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास जमलेल्या सर्व मान्यवरांच्या वतीनेअभिवादन करण्यात आले . यावेळी जमलेल्या सर्व समाज बांधवांनी जोरदार घोषणाबाजी करत राहुरी शहरातून तहसील कार्यालयावर नेण्यात आला तहसीलच्या आवारात मोर्चा गेल्यानंतर त्याचे भव्य सभेत रूपांतर झाले. त्यावेळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला जमलेल्या सर्वांनी अभिवादन करून सभेला सुरुवात झाली. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालानुसार राज्य सरकारांना अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरण करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सदर निर्णयामुळे अनुसूचित जातीमधील एकतेला बाधा पोहोचून सामाजिक दुरावा निर्माण होण्याची भीती असून

राज्य सरकारने अनुसूचित जाती प्रवर्गात कोणतेही उपवर्गीकरण करू नये व एकसंध असलेल्या समाजात फुट पाडू नये. न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल त्वरित प्रकाशित करावा, केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध पुनर्विचार याचिका दाखल करावी किंवा संसदेत कायद्याने संरक्षण द्यावे. पदोन्नतीमधील आरक्षण तत्काळ लागू करावे व अनु. जाती-जमातीतील मागील अनुशेष भरून काढावा व सर्व अनुसूचित जातींची जातनिहाय जनगणना करूनच पुढील धोरण निश्चित करावे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

याप्रसंगी मोर्चामध्ये अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणात प्रशासनाला इशारा दिला आहे. पुढचे पाऊल आमचे अहिल्यानगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेणार असून त्याची दखल न घेतल्यास मुंबई येथे मोर्चा धडकणार असून वेळ पडली तर दिल्लीला जंतर-मंतर मैदानावर आम्ही जाऊन सरकारकडे न्याय मागणार असल्याचे म्हटले आहे.

त्यामुळे सरकारने या मोर्चाची दखल घ्यावी. अन्यथा रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत हा भीमसैनिक लढत राहणार असल्याचे आंदोलकांनी म्हटले आहे.

या मोर्चामध्ये विशेष म्हणजे महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती. हजारोंच्या संख्येने समाजबांधव भर उन्हात राहुरी शहरातून तहसील कार्यालयाकडे घोषणा देत जाताना दिसत होते. शेवटी अनेक तरुणींच्या हाताने प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी तहसील कार्यालयातील पटांगण भरगच्च गर्दीने फुलून गेले होते. मोर्चात आरपीआय जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात,तालुकाध्यक्ष विलास नाना साळवे, प्रविण लोखंडे,सुभाष त्रिभुवन, वंचित बहुजन आघाडीचे पिंटू नाना साळवे, बाळासाहेब जाधव, बाळासाहेब गायकवाड, सचिन साळवे, विरोधी पक्षनेते अरुण साळवे, भाऊसाहेब पगारे, राजन ब्राम्हणे, सुनिता थोरात,सीमा बोरुडे, स्नेहल सांगळे, यमुना भालेराव, स्नेहल दिवे, सुनील चांदणे यांच्यासह हजारोच्या संख्येने भीमसैनिक उपस्थित होते.

# महसूल सहाय्यकासह कंत्राटी कर्मचाऱ्याला लाच घेताना पकडले

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीच्या नुकसानभरपाईची रक्कम मंजूर करून देण्यासाठी एक लाख गितल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आणि एका कंत्राटी कर्मचाऱ्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

यामध्ये महसूल सहाय्यक मंगेश विजय ढुमणे (सध्या नेमणूक जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर) आणि कंत्राटी कर्मचारी अमोल कानिफनाथ खामकर (उपविभागीय अधिकारी कार्यालय, श्रीगोंदा-पारनेर विभाग) यांचा समावेश आहे. तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीची मौजे जंगलेवाडी (ता. श्रीगोंदा) येथील १४३ गुंठे जमीन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 548-डीवरील रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पासाठी शासनाने संपादित केली होती. या भूसंपादनाच्या बदल्यात तक्रारदारांना अतिम व पुरवणी अवॉर्डनुसार सुमारे १ कोटी ४७ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली होती. मात्र, या रकमेतील प्रलंबित निधी मिळण्यासाठी आवश्यक असलेली एफ.टी.ओ. (फंड ट्रान्सफर ऑर्डर) मंजूर करून देण्याच्या प्रक्रियेत संशयित आरोपींनी लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संशयितांनी वेळोवेळी पैशांची मागणी केली होती. तसेच ४ मे २०२६ रोजी महसूल सहाय्यक मंगेश ढुमणे याने व्हॉट्सअ‍ॅप कॉलव्दारे तक्रारदारांशी संपर्क साधून एक लाख २० हजार रुपयांची मागणी केली.

# कर्जमाफीच्या जाचक अटींविरोधात खा. लंके आक्रमक

- २३ जूनला सर्वपक्षीय, शेतकरी संघटनेचे आंदोलन
- खासदार नीलेश लंके यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

पारनेर : (स. गांवकरी)



राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कृषी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, तसेच शेतकरी हिताच्या विविध मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा २३ जून रोजी पारनेर तालुक्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शेतकरी, सामाजिक व सर्वपक्षीय संघटनांनी दिला आहे.

यासंदर्भात खासदार लंके यांनी गुरुवारी तहसीलदार गायत्री सैंदाने यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे निवेदन सादर केले. या निवेदनात कर्जमाफी योजनेतील विविध अटींमुळे मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात जाहीर झालेल्या योजनेत अनेक निर्बंध घालण्यात आल्याने शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात सन २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेतील मर्यादा हटविणे, १२ लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांवरील अटी रद्द करणे, प्रोत्साहनपर अनुदानासाठीची दोन वर्षे नियमित कर्जफेडीची अट हटविणे, पीकविमा योजनेतील जाचक ट्रिगर अटी रद्द करणे आणि खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांचे पुनर्गठन करण्याच्या मागण्यांचाही समावेश आहे.

याशिवाय पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजी गॅसच्या वाढत्या दरांमध्ये कपात करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, पारनेर तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत शेतकरी प्रश्नांवर सर्वपक्षीय संघटना एकवटल्याचे चित्र पाहायला मिळाले. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २३ जून रोजी पारनेर तालुक्यातील सर्व प्रमुख रस्ते बंद करून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. पारनेर तालुक्यासह राज्यातील विविध भागांत मागण्या मान्य होईपर्यंत लोकशाही मार्गाने टप्प्याटप्प्याने आंदोलन उभारण्यात येणार असल्याचेही खासदार नीलेश लंके यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी हा लढा असून शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# राळेगण सिद्धीला मिळाले ‘T-55’ रणगाड्याचे मानाचे कवच



> माझ्या देशसेवेचा आणि सामाजिक कार्याचा सन्मान भारतीय सैन्याने या रणगाड्याच्या भेटीच्या माध्यमातून केला आहे. याचा मला अभिमान वाटतो. हा रणगाडा युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि सैन्याबद्दल आदर निर्माण करेल.
>
> **- अण्णासाहेब हजारे, ज्येष्ठ समाजसेवक.**

पारनेर : (स. गांवकरी)

ज्येष्ठ समाजसेवक आणि माजी सैनिक अण्णासाहेब हजारे यांच्या अद्वितीय राष्ट्रसेवेचा आणि सामाजिक कार्याचा सन्मान म्हणून, भारतीय संरक्षण मंत्रालय व भारतीय सैन्याच्या वतीने राळेगण सिद्धी गावाला ऐतिहासिक ‘T-55’ रणगाडा कायमस्वरूपी भेट देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील असा लष्करी गौरव प्राप्त करणारे राळेगण सिद्धी हे पहिलेच गाव ठरल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

हा रणगाडा केवळ युद्धसामग्री नसून, भारतीय सैन्याच्या शौर्याचे आणि बलिदानाचे प्रतीक आहे. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात व बांगलादेश मुक्ती संग्रामात या रणगाड्याने शत्रूला धूळ चारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. विशेष म्हणजे, अण्णा हजारे भारतीय सैन्यात कार्यरत असताना याच प्रकारच्या रणगाड्यांचा त्यांनी वापर केला होता. त्यामुळे या भेटीने अण्णांच्या लष्करी कारकिर्दीच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. हा रणगाडा राळेगण सिद्धीमध्ये स्थापित करण्यासाठी गेल्या वर्षभरापासून प्रशासकीय व कायदेशीर स्तरावर प्रयत्न सुरू होते. जिल्हा व सत्र न्यायालयाचे नोडल अधिकारी चंद्रकांत शिंदे यांनी या प्रक्रियेत अत्यंत मोलाची भूमिका बजावली. त्यांच्यासह लेफ्टनंट जनरल आर. आर. निंबोरकर (निवृत्त) आणि दादा पठारे यांनी संरक्षण मंत्रालय व सैन्य प्रशासनासोबत सातत्याने समन्वय साधला. अनेक तांत्रिक व कायदेशीर अडचणींवर मात करत, या तिघांच्या अथक प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक उपक्रम यशस्वी झाला आहे.हा रणगाडा आता गावातील प्रमुख दर्शनीय ठिकाणी स्थापित केला जाणार आहे. यामुळे राळेगण सिद्धीला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी आणि देशाच्या भावी पिढीसाठी हा रणगाडा राष्ट्रभक्ती, शिस्त आणि सैन्याबद्दलच्या आदराचे एक जिवंत प्रेरणास्थान ठरणार आहे. राळेगण सिद्धीच्या इतिहासातील हा एक सुवर्णक्षण मानला जात असून, या ऐतिहासिक कार्यासाठी चंद्रकांत शिंदे, लेफ्टनंट जनरल निंबोरकर आणि दादा पठारे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# “शिवराज्याभिषेक दिनानिमित्त उत्साहाचे वातावरण

कळवण : (स. गांवकरी)



कळवण तालुक्यातील ओतूर गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करून हा ऐतिहासिक दिवस मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. शिवरायांच्या स्वराज्याच्या विचारांना उजाळा देत गावात स्वच्छता अभियानासह अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले. शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत गाव परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक संघटनांच्या सहभागातून गाव स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्याचा संदेश देण्यात आला. “स्वच्छ गाव, सुंदर गाव” या संकल्पनेला बळ देत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी ओतूर येथील इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत उल्लेखनीय व भरघोस यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांना विविध बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. गावातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांनी कौतुकाचा वर्षाव केला. या उपक्रमामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

तसेच गावातील सुपुत्र चरण दिपक माळी यांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# शिवजन्मभूमीच्या संस्कारांना गुन्हेगारीचे ग्रहण का?

(स. गांवकरी)

प्रा. डॉ. विशाल गायकवाड
पुणे मो.९८८१९७२२८६

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला जुन्नर तालुका म्हणजे इतिहास, संस्कृती, शिक्षण, अध्यात्म आणि निसर्ग यांचे अद्भुत संगमस्थान. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला हा तालुका केवळ महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण देशाचा अभिमान आहे.

लेण्याद्रीचा अष्टविनायक गणपती, ओझरचा विघ्नहर, कुकडेश्वर मंदिर, हरिश्चंद्रगड, खिरेश्वर, माळगंगा देवीचे मंदिर, नाणेघाट, शिवनेरी यांसारख्या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांनी हा परिसर समृद्ध केला आहे. डोंगर-दऱ्या, माळराने, धरणे, शेतजमिनी आणि कष्टकरी माणसांनी हा तालुका घडविला आहे. जुन्नरची खरी ओळख मात्र त्याच्या माणुसकीत आहे. इथल्या लोकांनी समाजकारण, शिक्षण आणि लोकहिताची परंपरा पिढ्यान्पिढ्या जपली आहे. महाराष्ट्राला अनेक समाजसुधारक, शिक्षक, राजकारणी आणि लोकनेते देण्याचे भाग्य या भूमीला लाभले आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जुन्नर-ओतूरशी असलेले नाते तर इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांच्या सहकार्याने ओतूर येथे मुलींची शाळा सुरू करून फुले दांपत्याने स्त्रीशिक्षणाची क्रांती या भागात आणली. १८७७ च्या दुष्काळात सावित्रीबाई स्वतः ओतूर येथे राहून हजारो दुष्काळग्रस्तांना मदत करत होत्या. सत्यशोधक चळवळीचा आणि सामाजिक न्यायाचा दीप या भूमीतही तेवत राहिला.

अशा या संस्कारक्षम, इतिहासप्रसिद्ध आणि शिक्षणप्रेमी तालुक्यात गेल्या काही वर्षांत वाढत चाललेली गुन्हेगारी चिंतेचा विषय ठरत आहे. पारगाव-मढ-बागडवाडी येथील धक्कादायक घटना, कोयता गँगचे वाढते प्रस्थ, नेतवडमधील सोन्याची चोरी, वेगवेगळ्या परिसरातील विविध घरफोड्या, महिलांविरुद्ध घडणारे गुन्हे आणि वाढती दहशत यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. प्रश्न असा आहे की, ज्या भूमीने शिवराय घडवले, फुले घडवले, समाजसुधारक घडवले, त्या भूमीत गुन्हेगारीची बीजे का रुजत आहेत?

यामागे अनेक कारणे दिसून येतात जसे बेरोजगारी, व्यसनाधीनता, सोशल मीडियातून वाढणारी गुंडगिरीची आकर्षणे, पालकांचे कमी होत चाललेले नियंत्रण, काही प्रमाणात राजकीय पाठबळ, गावांमधील सामूहिक सामाजिक नियंत्रणाचा अभाव आणि कायद्याची भीती कमी होणे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना तलवारीच्या बळावर जितकी केली, तितकीच ती लोकांच्या विश्वासावर आणि शिस्तीवर उभी केली.

आज त्या शिवजन्मभूमीला पुन्हा एकदा त्याच शिस्तीची, त्याच सामाजिक बांधिलकीची आणि त्याच लोकसहभागाची गरज आहे. जुन्नर हा केवळ एक तालुका नाही; तो महाराष्ट्राच्या संस्कारांचा वारसा आहे. हा वारसा जपण्याची aजबाबदारी प्रशासनाइतकीच नागरिकांचीही आहे. चला, राजकारण, जात-पात आणि वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून एकत्र येऊया. आपल्या मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी, आपल्या गावांच्या शांततेसाठी आणि आपल्या शिवजन्मभूमीच्या प्रतिष्ठेसाठी...

## गावागावांनी काय करावे?

१. प्रत्येक गावात "ग्राम सुरक्षा समिती" सक्रिय करावी.
२. युवकांसाठी क्रीडा स्पर्धा, व्यसनमुक्ती अभियान आणि कौशल्य विकास कार्यक्रम राबवावेत.
३. गावातील सीसीटीव्ही व्यवस्था मजबूत करावी.
४. रात्रीची गस्त आणि नागरिक-पोलिस संवाद वाढवावा.
५. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कायद्याचे शिक्षण, सायबर गुन्हे आणि सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन व्हावे.
६. संशयास्पद हालचालींबाबत नागरिकांनी तत्काळ माहिती द्यावी.
७. धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांनी युवकांना विधायक मार्गावर नेण्यासाठी पुढाकार घ्यावा.
८. व्यसनमुक्ती आणि समुपदेशन केंद्रांची संख्या वाढवावी.

# उच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे किनवट कृषी उत्पन्न बाजार समिती अविश्वास ठरावाची लढत रंगतदार टप्प्यात

किनवट : (स. गांवकरी)

कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवटचे सभापती गजानन गोविंदराव मुंडे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास प्रस्तावावर आज (बुधवारी) होणारे मतदान आणि त्यासाठी बोलाविण्यात आलेली विशेष सभा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या स्थगिती आदेशामुळे अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडली आहे. या घडामोडीमुळे बाजार समितीच्या राजकारणात नवे वळण आले असून सभापती समर्थक आणि विरोधक अशा दोन्ही गटांमध्ये उत्सुकता वाढली आहे. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम २३-अ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या अविश्वास प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी दि. १० जून रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत विद्यमान संचालकांकडून मतदान घेण्यात येणार होते.

मात्र सभापती गजानन मुंडे यांनी या प्रक्रियेविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केल्यानंतर न्यायालयाने विशेष सभेलाच स्थगिती दिली. तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी डॉ. शारदा चोंडेकर यांनी मंगळवारी उशिरा जारी केलेल्या आदेशानुसार नियोजित विशेष सभा होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच स्थगिती आदेशाची प्रत सर्व संचालकांना तामील करण्याचे निर्देश बाजार समिती प्रशासनाला देण्यात आले आहेत. दरम्यान, अविश्वास प्रस्तावावर मतदान होणार की नाही, याबाबत गेल्या काही दिवसांपासून किनवट तालुक्यात राजकीय चर्चांना उधाण आले होते. विविध गटांकडून आपापल्या बाजूने संख्या बल असल्याचे दावे केले जात होते. त्यामुळे आजच्या सभेकडे केवळ बाजार समितीतील पदाधिकारीच नव्हे तर शेतकरी, व्यापारी, हमाल-मापाडी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित घटकांची लक्ष लागले होते. मात्र न्यायालयीन स्थगितीमुळे या सर्व चर्चांना तात्पुरता विराम मिळाला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बाजार समितीतील पुढील राजकीय समीकरणे काय आकार घेणार, न्यायालयात पुढे कोणता निर्णय होणार, तसेच अविश्वास प्रस्तावावरील मतदानासाठी नव्याने सभा कधी बोलावली जाणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.




ठाणे : दिवा साबेगाव येथील ठाणे महानगरपालिका शाळा लवकरच सुरु होणार असून शाळा क्रमांक ८० मधील बेढब वाढलेल्या झाडांची छाटणी शाळा चालू होण्यापूर्वी करण्यात आली जेणेकरून पावसाळी आपघात किंवा कोणताही आपतकालीन घटना घडू नये यासाठी ठाणे महानगर पालिका प्रभाग २९ च्या नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांनी तत्परता दाखवत सदर कामे करून घेतली. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...

### प्राचार्य हेमंत इंगळे यांना पी एच. डी. पदवी प्रदान



मुदखेड (स. गांवकरी) : शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथील प्राचार्य हेमंत इंगळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विज्ञान शाखेतील इतिहास विषयातील विद्यावाचस्पती पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. प्राचार्य हेमंत इंगळे यांनी इतिहास विषयातील 'डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या प्राचीन भारताच्या इतिहास लेखनाचे विश्लेषणात्मक अध्ययन 'या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता. आज अंतिम मौखिक परीक्षा झाली. यावेळी मानव्य विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके , बंदिस्त परीक्षक डॉ वाघमारे, संशोधन मार्गदर्शक डॉ. राहूल वरवंटीकर , डॉ संजय झुंबाडे, प्रा. कैलास खानसोळे, प्रकाश फाजगे यांच्या उपस्थितीत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती पी एच डी.पदवी प्रदान केली. त्याबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजयराव देशमुख, श्री शितलादेवी सेवाभावी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.छायाबाई संजयराव देशमुख, दोन्ही संस्थेचे कार्यकारी मंडळ,स्वा से राजारामबापू माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुब्बेवार व सर्व स्टाफ, शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड सर्व स्टाफ,शंकरराव देशमुख इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सचिन गव्हाणे व सर्व स्टाफच्या वतीने अभिनंदन व भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### मुदखेड-माळकोटा रोडवर कारचा भीषण अपघात; दोघांना जबर मार

मुदखेड (स. गांवकरी) : मुदखेड-माळकोटा रोडवरील श्रीकृष्ण पेट्रोल पंपाजवळ आज पहाटेच्या सुमारास एका कारचा अत्यंत भीषण अपघात झाला. चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला असलेल्या मुरमाच्या ढिगाऱ्याला आणि संकेतांक खांबाला धडकून पलटी झाली. या अपघातात कारमधील दोघे जण जबर जखमी झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, अंबाजोगाई येथील चालक अजय नवघरे (वय २१ वर्ष) आणि करण विनायक जोगदंड हे दोघे कारने (भाड्याने) उमरी येथे प्रवाशांना सोडण्यासाठी गेले होते. उमरीवरून आपले काम आटपून ते कारने परत अंबाजोगाईकडे निघाले होते. मात्र, रात्रभर सतत प्रवास केल्यामुळे पहाटेच्या सुमारास चालकाला अचानक डुलकी लागली. पहाटे सव्वा सहा वाजेच्या सुमारास मुदखेड-माळकोटा रोडवरील श्रीकृष्ण पेट्रोल पंपाच्या समोर आणि 'पंचकृष्ण हॉटेल'च्या बाजूला कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव कार थेट रस्त्याशेजारील मुरमाच्या ढिगाऱ्यावर चढली आणि बाजूच्या खांबाला धडकून उलटली. अपघात इतका भीषण होता की गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. हा अपघात घडला त्याच वेळी व्यंकटी मुंगल हे तिथे उपस्थित होते. त्यांच्या डोळ्यांदेखत हा थरार घडला. त्यांनी कोणतीही वाट न पाहता तात्काळ गाडीकडे धाव घेतली. राजेश मुंगल, प्रमोद मुंगल ग्रामसेवक साहेब शिवाजी मुंगल आणि इतर काही सहकारी धावून आले. या सर्वांनी मोठ्या शर्थीने कारमध्ये अडकलेल्या अजय नवघरे आणि करण जोगदंड या दोघांना सुखरूप बाहेर काढले. येथील व्यंकटी मुंगल यांनी सामाजिक भान जपत जखमींना तात्काळ स्वतःच्या वाहनाने मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून जखमींवर तातडीने उपचार सुरू केले. योग्य वेळी मदत आणि उपचार मिळाल्याबद्दल जखमींच्या नातेवाईकांनी आणि नागरिकांनी मुंगल कुटुंबीय तसेच मुदखेड येथील डॉक्टरांचे आभार मानले आहेत.



### दिव्यांग कर्मचारी संघटनेची जिल्हा बैठक उत्साहात

नाशिक (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेची जिल्हा बैठक नुकतीच संघटनेचे मार्गदर्शक तथा शिक्षण विस्तार अधिकारी भाऊसाहेब जगताप यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. यावेळी नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र बाळासाहेब सोनवणे यांची महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जिल्हा संघटनेच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार सोहळा जिल्हाध्यक्ष सोमनाथ कराड व भाऊसाहेब जगताप यांच्या हस्ते पार पडला. यावेळी व्यासपीठावर राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे, राज्य उपाध्यक्ष सतीश लाड, राज्य सहसचिव राजेश निकुंभ, विभागीय कोषाध्यक्ष सुरेश कापडणीस, राज्य संचालक मनोहर नेतावटे, विनोद अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत दिव्यांग कर्मचारी, अधिकारी व दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ६ मे २०२६ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे संघटनेच्यावतीने स्वागत करण्यात आले. या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर व संघटनात्मक भूमिकेबाबत मार्गदर्शन राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी केले. तसेच जिल्हाध्यक्ष सोमनाथ कराड यांनी न्यायालयीन निर्णयाबाबत तसेच दिव्यांग कर्मचारी समस्यांबाबत मार्गदर्शन केले.

# अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

## हायवा वाहनासह लाखोंचा मुद्देमाल जप्त

किनवट : (स. गांवकरी)

किनवट शहरातील सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्त्यावर अवैध रेती वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनावर किनवट पोलिसांनी धडक कारवाई करत सुमारे २५ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक झाडे हे करीत आहेत. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ८ जून २०२६ रोजी पहाटे २.१२ वाजण्याच्या सुमारास मा. सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील किनवट रोडवर, शहराच्या दक्षिणेस सुमारे ५०० मीटर अंतरावर ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी संगनमत करून हायवा क्रमांक MH-40-CM-8110 या वाहनातून अंदाजे ६ ब्रास रेतीची चोरटी वाहतूक व विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक सुरू केली होती. या प्रकरणी प्रल्हाद लक्ष्मण जाधव (वय ५४), व्यवसाय नोकरी, API पोलीस स्टेशन किनवट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात गुरनं 130/2026 अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम 303(2), 3(5), तसेच जमीन महसूल अधिनियम कलम 47, 48 आणि मोटार वाहन कायदा कलम 184 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींमध्ये सुरेश किशन अंकुरवार (वय ३९, व्यवसाय चालक, रा. वायफनी, पो. करंजी, ता. माहूर), ज्ञानेश्वर दहिफळे (रा. बोधडी बु.),



तसेच रेती विक्रीचा मुनीम सागर गोविंद नागरगोजे (रा. बोधडी बु., ता. किनवट) यांचा समावेश आहे.

जप्त करण्यात आलेल्या हायवा वाहनाची किंमत अंदाजे २५ लाख रुपये असून वाहतूक होत असलेल्या ६ ब्रास रेतीची किंमत सुमारे ३६ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर गुन्ह्याची नोंद दि. ८ जून रोजी पहाटे ३.३९ वाजता ठाणे दैनंदिनी क्रमांक ०३ वर करण्यात आली.

पोलीस ठाणे किनवटचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गुन्ह्याचा पुढील तपास PSI झाडे करीत आहेत.

# पाऊस लांबला, पेरण्या खोळंबल्या

- १० जून उलटला तरी पावसाची प्रतीक्षा; शेतकरी चिंतेत
- अजून ४-५ दिवस असेच गेले तर पेरणी लांबणीवर – शेतकऱ्यांची व्यथा

कनाशी : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यात खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी शेतीची मशागत करून पेरणीची तयारी पूर्ण केली आहे. मात्र १० जून उलटूनही पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी नांगरणी, कुळवणी करून शेत पेरणीसाठी तयार ठेवले आहे. बियाणे, खतांची जुळवाजुळवही करून ठेवली आहे. पारंपरिक अंदाजानुसार मृग नक्षत्रात पेरणी केली जाते. मात्र यंदा 10 जून उलटला तरी समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. शेत तयार आहे, पण पावसाविना पेरणी करता येत नाही. जर असेच वातावरण अजून 4-5 दिवस राहिले, तर पेरण्या लांबणीवर जातील. उशिरा पेरणी झाली तर उत्पादनावर परिणाम होतो," अशी भीती गंगापूर येथील शेतकरी भाऊराव (पाटील)बहिरम यांनी व्यक्त केली. पेरणीसाठी जमिनीत किमान 3-4 इंच ओल असावी लागते. सध्या एक उठावणी पाऊस जरी पडला असला तरी , पण पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. भरपूर पाऊस झाला की एकाच वेळी तालुक्यात पेरणीला वेग येणार आहे. सध्या कळवण तालुक्यातील शेतकरी राजा पूर्णपणे पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

# वाढत्या बालमाता प्रमाणाला आळा घालण्यासाठी ठोस चर्चा!

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यात वाढत असलेल्या बालमाता प्रकरणांना आळा घालण्यासाठी प्रभावी कृती कार्यक्रम राबविण्याची गरज असून, या विषयावर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न व्हावेत यासाठी आज राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव मा. नंदिनी आवडे यांची भेट घेण्यात आली. यावेळी बालविवाह व बालमाता या गंभीर सामाजिक समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत अकोले तालुक्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला तसेच बालविवाह रोखण्यासाठी आणि अल्पवयीन मुलींचे शिक्षण, आरोग्य व सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजनांबाबत विचारविनिमय करण्यात आला. यासोबतच जनजागृती मोहिमा, शासकीय यंत्रणा, महिला व बाल विकास विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग तसेच सामाजिक संस्थांच्या समन्वयातून व्यापक कृती आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला. या प्रश्नाशी संबंधित सर्व घटकांना



एकत्रित करून पुढील काळात व्यापक स्तरावर काम करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बालविवाह आणि त्यातून निर्माण होणाऱ्या बालमाता समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी समाजातील सर्व स्तरांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. भावी पिढीला बालविवाह आणि बालमाता यांसारख्या कुप्रथांपासून संरक्षण मिळावे, मुलींना शिक्षण व सन्मानाने जगण्याची संधी मिळावी आणि समाज अधिक प्रगत व सशक्त व्हावा यासाठी ही मोहीम महत्त्वाची ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# जामखेड आगाराला मिळाल्या ५ राजमाता जिजाऊ बस

- ग्रामीण भागातील जनता व विद्यार्थ्यांना मिळाला दिलासा
- पदाधिकारी व प्रवाशांनी मानले आभार

जामखेड : (स. गांवकरी)

कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून जामखेड आगाराला ५ नवीन एसटी बसेस उपलब्ध झाल्या आहेत. या नव्या बसेस आगारात दाखल झाल्याने प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून आज दि. ७ जून रोजी जामखेड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जामखेड स्वागत करत प्रातिनिधिक स्वरूपात जामखेड बसस्थानक असा प्रवास करून आनंद उत्सव साजरा केला.



गेल्या काही कालावधीपासून जामखेड आगारातील बससेची परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली होती. आगारातील चांगल्या स्थितीतील बसेस इतर आगारांकडे वर्ग करण्यात आल्याने जामखेडकरांच्या वाट्याला जीर्ण व खराब अवस्थेतील बसेस आल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांना वारंवार बस बिघाड, बस उशिरा येणे, फेऱ्या रद्द होणे तसेच असुरक्षित प्रवासाचा सामना करावा लागत होता. या समस्येमुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रोजंदारीवर कामासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत होता. ग्रामीण भागातील अनेक मार्गांवर बसेसची कमतरता असल्याने काही फेऱ्या नियमितपणे चालत नव्हत्या. याचा थेट परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत होता. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे जामखेड आगारासाठी तातडीने नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार जामखेड आगाराला ५ नवीन बसगाड्या मंजूर करण्यात आल्या असून त्या आगारात दाखल झाल्या आहेत.

नवीन बसेस उपलब्ध झाल्यानंतर जामखेड येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. यावेळी जामखेड डेपो ते एसटी बसस्थानक अशी नव्या बसमधून फेरी काढण्यात आली. तसेच आमदार रोहित पवार यांच्या नावाचा जयघोष करत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे युवक तालुका अध्यक्ष प्रशांत राळेभात, शहराध्यक्ष राजेंद्र गोरे, नगरसेवक वसीम सय्यद, माजी ग्रामपंचायत सदस्य इस्माईल सय्यद, प्रा, कुंडल राळेभात, सचिन शिंदे, रमेश आजबे, नरेंद्र जाधव, मनोज कार्ले, दादा महाडिक, ज्येष्ठ नेते सुरेश भोसले, वैजनाथ पोले, संजय वराट, सूर्यकांत मोरे, संदीप गायकवाड आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सांगितले की, नवीन बसेस उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण भागातील बससेवा अधिक सक्षम होणार असून प्रवाशांना सुरक्षित, वेळेवर आणि दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. तालुक्यातील नागरिकांच्या वतीने आमदार रोहित पवार यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. तसेच भविष्यात जामखेड आगाराला आणखी नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

# प्रभू श्रीरामांच्या जयघोषात कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा

## साधू-संत, महंत, विविध सामाजिक व धार्मिक संस्थाचा सक्रिय सहभाग

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा शुभारंभ ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळ्याने झाला. साधू-संत, महंत, विविध सामाजिक व धार्मिक संस्थाचा सक्रिय सहभाग होता. श्री गंगा गोदावरी पंचकोठी (तीर्थ) पुरोहित संघ, नाशिक यांच्या वतीने कमला एकादशीच्या पर्वावर आज सकाळी पवित्र रामकुंड येथे श्रीरामाच्या जयघोषात आणि वेद मंत्रोच्चारात सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा पार पडला. या सोहळ्यास कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन प्रमुख उपस्थित



होते. याप्रसंगी महापौर हिमगौरी आडके-आहेर, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री, उपमहापौर विलास शिंदे, जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, माजी आमदार बाळासाहेब सानप, पुरोहित संघाचे सतीश शुक्ल यांच्यासह विविध आखाड्यांचे प्रमुख साधू-संत व महंत उपस्थित होते. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि जिल्ह्यात विविध विकासकामांना गती मिळाली आहे. रस्ते, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता आणि नागरी सुविधांसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांची अंमलबजावणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या कामांमुळे पुढील वर्षी नाशिकचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज आणि संजयदास महाराज यांनीही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमास दिगंबर आखाड्याचे महंत वैष्णवदास महाराज, मंगल पीठाधीश्वर माधवाचार्य महाराज, निर्वाणी आखाड्याचे महंत मुरलीधरदास महाराज, महंत मोहनदास महाराज, महंत राजेंद्रदास महाराज, महंत रामजीदास महाराज, महंत भक्तिचरणदास महाराज, रामकिशोरदास शास्त्री महाराज, महंत रामस्नेहीदास महाराज यांच्यासह विविध आखाड्यांचे संत-महंत, भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पुढील वर्षी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यास मागील मेळ्याच्या तुलनेत चार ते पाच पट अधिक, म्हणजेच १२ कोटींपेक्षा जास्त भाविक येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे कुंभमेळा यशस्वी करण्याची जबाबदारी शासन आणि प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची आहे. गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी विविध संस्था आणि भाविकांनी पुढाकार घेतला असून ही स्वच्छता सातत्याने राखली जाईल, देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी प्रत्येक नाशिककराने स्वयंसेवक म्हणून पुढे यावे,
>
> **- मंत्री गिरीश महाजन**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### बोलेरो पिक-अपमधून ५.७२ लाखांचा विदेशी मद्यसाठा जप्त, एकाला अटक

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील वघई पोलिसांनी बेकायदेशीर विदेशी मद्य वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत ५.७२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका युवकाला अटक केली आहे.वघई पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक ए. ए. चावडा यांनी कर्मचाऱ्यांना सतत गस्त व देखरेख ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस पथक कुडकस गाव ते गिरा दाबदर गावादरम्यान असलेल्या खापरी नदी पुलावर नजर ठेवून होते. सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास संशयास्पद पांढऱ्या रंगाची बोलेरो पिक-अप (क्रमांक GJ-26-T-8035) तेथून जात असताना पोलिसांनी ती अडवून तपासणी केली. तपासादरम्यान वाहनाच्या केबिनच्या मागील भागात ताडपत्रीखाली अत्यंत चतुराईने तयार केलेला गुप्त कप्पा आढळून आला. हा कप्पा उघडल्यावर त्यातून भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या १,१८८ बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मद्यसाठ्याची किंमत २,६७,९७२ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत पोलिसांनी २,६७,९७२ रुपयांचा मद्यसाठा, ३ लाख रुपये किमतीची बोलेरो पिक-अप आणि ५ हजार रुपये किमतीचा अँड्रॉइड मोबाईल असा एकूण ५,७२,९७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी मोहितभाई शिवमभाई चौधरी (वय २४) याला अटक करण्यात आली आहे. तो व्यवसायाने चालक असून सध्या कडोदरा (सुरत) येथे राहतो. मूळचा तो उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्यातील चेतावर गावचा रहिवासी आहे. या मद्य तस्करी प्रकरणात सहभागी असलेल्या आणखी एका आरोपीचा शोध सुरू असून धीरज उर्फ कालीया याला पोलिसांनी वाँटेड घोषित केले आहे. त्याची संपूर्ण ओळख आणि पत्ता शोधण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांचा मुल्यमापन निकाल संकेतस्थळावर जाहीर

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र मुक्त विद्यालय मंडळ, पुणेमार्फत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळामार्फत इयत्ता 5 वी प्राथमिक स्तर व इयत्ता 8 वी उच्च प्राथमिक स्तराच्या मूल्यमापनासाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यासाठी 15 एप्रिल ते 25 एप्रिल 2026 या कालावधीत मूल्यमापन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या मूल्यमापनाचा निकाल www.msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर 11 जून 2026 रोजी जाहिर करण्यात आला आहे. या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची विषयनिहाय श्रेणी दर्शविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना सदर माहितीची प्रिंट घेता येईल. पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे इयत्ता 5 वी ते 8 वी ची अर्हता व विद्याविषयक कौशल्य प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र यथावकाश वितरीत करण्यात येईल असे आवाहन लातूर विभागीय मंडळाचे सचिव यांनी केले आहे.

### मातोश्री शासकीय मुलांचे वसतीगृहात १५ ते ३० जूनदरम्यान प्रवेश सुरु

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांचे वसतीगृह, उच्च शिक्षण, तथागत नगर, मालेगाव रोड, नांदेड या वसतीगृहात शैक्षणिक वर्ष 2026-2027 साठी नांदेड शहर परिसरातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवीसाठी शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार निवासाची व भोजनाची विनामुल्य सोय करण्यात येत आहे. प्रस्तुत वसतीगृहात शैक्षणिक वर्ष 2026-2027 साठीच्या पुर्न-प्रवेश / नूतन प्रवेशाबाबत याव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत. पुर्न- प्रवेश /नूतन प्रवेशाचे अर्ज वसतीगृहात कार्यालयीन वेळेत 15 ते 30 जून, 2026 या कालावधीत (शासकीय सुट्ट्यांचे दिवस वगळून ) उपलब्ध करण्यात आलेले आहेत. सदर कालावधीत परिपुर्ण पुर्न-प्रवेश / नूतन प्रवेशाचे अर्ज हे संबंधित विहित कागदपत्रांसह स्विकारण्यात येईल. वरील निश्चित केलेल्या कालावधीनंतरचे आलेल्या अर्जाचा स्विकार केला जाणार नाही याची विद्यार्थी पालक तथा विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन गृहप्रमुख मातोश्री शासकीय इबीसी मुलांचे वसतीगृह नांदेड यांनी केले आहे.

### पहिल्या टप्प्यात ३७.५२ लाख लसमात्रांचे वाटप सुरू

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पी चर्मरोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षाकरिता आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांचे उत्पादन 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' येथे सुरू झाले आहे. २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील जिल्ह्यानिहाय गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन, पहिल्या टप्प्यात एकूण लस उत्पादनाच्या ४० टक्के म्हणजेच ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे वाटप नियोजनबद्ध रीतीने सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' या संस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीपणे केले आहे. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी पुरवण्यात आलेली लस क्षेत्रीय स्तरावर वेळेत पोहोचवताना तिची शीत साखळी कुठेही खंडित होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी, गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षमता असलेल्या पशुंचे प्राधान्याने लसीकरण करण्यात यावे, लसीकरणाच्या विहित नमुन्यातील बिनचूक आणि एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत विभागनिहाय संस्थेकडे सादर करावा; अशा सूचना 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' या संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना केल्या आहेत.

### राज्यात मान्सूनपुर्व रोगप्रतिबंधक लसीकरणाला मोहिम स्वरुपात प्रारंभ

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' आता युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे आपले मुख्य ध्येय असून, निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी विभागाने काटेकोर नियोजन केले आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# मालमत्ता कर आकारणी विरोधात महापालिकेकडे हरकत

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



महानगरपालिकेकडून मालमत्तेवर करण्यात आलेल्या कर आकारणीविरोधात सावेडी येथील माजी नौदल कर्मचारी मनसुख पाटीलराव बावळे यांनी महापालिका प्रशासनाकडे लेखी हरकत नोंदवली आहे. संबंधित मालमत्तेवर आकारण्यात आलेला कर अवाजवी, अन्यायकारक व नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणारा असल्याचा दावा त्यांनी आपल्या निवेदनात केला आहे.

बावळे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, भारतीय नौदलातील सेवेनंतर मिळालेल्या निवृत्तीवेतन व सेवानिवृत्तीच्या निधीतून त्यांनी संबंधित मालमत्ता खरेदी केली आहे. या मालमत्तेसंदर्भातील सर्व शासकीय कर, शुल्क व इतर देयके नियमितपणे भरलेली असून कायद्याचे पालन केले आहे. असे असताना महानगरपालिकेकडून भाडे उत्पन्नाच्या आधारे करण्यात आलेली कर आकारणी जास्त असल्याने त्याचा आर्थिक भार सहन करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

याशिवाय, मालमत्तेतून मिळणाऱ्या भाडे उत्पन्नावर शासनाकडे नियमितपणे आयकर भरला जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे त्याच उत्पन्नावर अतिरिक्त स्वरूपाची कर आकारणी करणे अन्यायकारक असून नागरिकांवर दुहेरी आर्थिक भार टाकणारे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

निवेदनात पुढे त्यांनी नमूद केले आहे की, भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न हे माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी, स्वयंरोजगारासाठी तसेच वयोमानानुसार आर्थिक सुरक्षितता मिळावी या उद्देशाने केलेली तरतूद आहे. देशसेवेनंतर स्वावलंबी राहण्यासाठी आणि कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी उभारलेल्या या उत्पन्नाच्या साधनावर अतिरिक्त करांचा बोजा टाकणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. शासनाकडे आयकर भरत असतानाच स्थानिक स्वराज्य संस्थेकडूनही त्याच उत्पन्नावर कर आकारला जात असल्याने आर्थिक ताण वाढत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, नियमितपणे विविध कर भरत असताना उत्पन्नाच्या मिळकतीवर अतिरिक्त भार टाकणे अन्यायकारक असून ही एक प्रकारची आर्थिक लूट असल्याचे वाटते. माजी सैनिकांना शासनाकडून विविध करांमध्ये सवलती दिल्या जात असताना स्थानिक स्वराज्य संस्थांनीही त्याचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मालमत्तेची कर आकारणी उत्पन्नाच्या आधारे न करता जागेच्या क्षेत्रफळानुसार करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. तसेच या संदर्भातील नियमांचा सखोल अभ्यास करून योग्य निर्णय घ्यावा व कर आकारणीची पद्धत अधिक पारदर्शक करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

महानगरपालिका प्रशासनाने संबंधित प्रकरणाचा वस्तुनिष्ठपणे विचार करून कर आकारणीचा फेरविचार करावा तसेच नागरिकांवर अनावश्यक आर्थिक भार पडणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. दरम्यान, या निवेदनामुळे मालमत्ता कर आकारणीच्या विद्यमान पद्धतीबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून महापालिका प्रशासन याबाबत काय भूमिका घेते याकडे संबंधित नागरिकांचे लक्ष लागले आहे. याबाबत न्याय मिळविण्यासाठी केंद्रीय संरक्षण मंत्री, माजी सैनिक कल्याण विभागाचे मंत्री तसेच संबंधित शासकीय स्तरावर पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे बावळे यांनी सांगितले. माजी सैनिकांच्या न्याय्य मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित यंत्रणांकडून सकारात्मक सहकार्य मिळेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. या निवेदनाची प्रत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनाही पाठविण्यात आली आहे.

## पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांच्याकडे तक्रारी

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर चे पालकमंत्री जयकुमार गोरे हे फडणवीस साहेबांचे अत्यंत जवळचे आहेत परंतु मुख्यमंत्री महोदय यांच्या प्रतिमेला डाग लागणार नाही याची दक्षता नक्की घेतील. आणि सोलापूर मधील अवैध धंदे तात्काळ बंद करण्यासाठी पावले उचलतील अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सुहास कदम यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन देऊन केली आहे. सोलापूर मधील अवैध धंदे आणि अवैध कारणांमुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा मलिन होत आहे, त्यामुळे लवकरच ही अवैध धंदे बंद करण्यात यावी अशीही मागणी कदम यांनी केली आहे. सोलापूर मधील अवैध धंदे याविरुद्ध आपली मोहीम चालूच राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. एखाद्या वाईट प्रवृत्ती विरोधात लढत असताना टप्प्याने जाणे म्हणजे ही यशाची शिदोरी असते,त्यामुळे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतली, आणि सोलापूर मधील अवैध धंदे बंद करण्यात यावे या मागणीचे निवेदन त्यांना दिले आहे. मुख्यमंत्री यांची प्रतिमा स्वच्छ ठेवायची की कलंकित करायची आता अवैध धंदे बंद झाल्याच्या कृतीतून दिसणार आहे. असेही कदम यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे पालकमंत्री हे नक्की न्याय देतील आणि सोलापूर मधील अवैध धंदे बंद करतील असा विश्वास मला आहे. असेही सुहास कदम यांनी म्हटले आहे. सोलापूर शहरातील अवैध धंदेचा कॅप्टन आणि दोन व्हाईस कॅप्टन विरोधात त्यांनी केलेले अनेक काळे कारनामे निवेदनाच्या माध्यमातून लेखी स्वरूपात पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दिले आहे.

## महापालिकेकडून सर्जेपुरा रोडवरील अतिक्रमणांवर हातोडा

- आमदार संग्राम जगताप यांची पाहणी
- आधी हिरवे अतिक्रमण काढा, मग आम्ही आमची काढू – आमदार संग्राम जगताप

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी आणि डीपी रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्णत्वास नेण्यासाठी महानगरपालिकेकडून सर्जेपुरा रोडवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या कारवाईची आमदार संग्राम जगताप यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला विविध सूचना दिल्या. यावेळी त्यांनी अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे, अशी ठाम भूमिका मांडत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्य शासनाकडून शहरातील डीपी रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून आणण्यात आला असून गेल्या एक वर्षापासून विविध रस्त्यांची काँक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांमध्ये अडथळा ठरणारी अनेक अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मात्र या प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी दुहेरी निकष लावले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहराच्या विकासासाठी रस्ते रुंदीकरण आणि काँक्रिटीकरण अत्यंत आवश्यक आहे. अनेक नागरिकांनी विकासकामांना सहकार्य करत स्वतःहून आपली अतिक्रमणे आणि हिंदू धर्माशी संबंधित धार्मिक स्थळे मागे घेतली. शहराच्या विकासाला प्राधान्य देत त्यांनी मोठा त्याग केला. मात्र काही प्रवृत्तींकडून अतिक्रमणे कायम ठेवली जात आहेत आणि त्यावर कारवाई करण्यास प्रशासन धजावत नसल्याचे चित्र दिसत आहे.

ते पुढे म्हणाले की, अचानक रस्त्याच्या कडेला थडगी उभी करणे, त्यांना रंगरंगोटी करणे आणि त्याच्या आडून रस्त्यांमध्ये अतिक्रमण निर्माण करणे ही गंभीर बाब आहे. अशा अनधिकृत थडग्यांचे वाढते प्रमाण हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे.

विकासकामांसाठी जर हिंदू धर्माशी संबंधित धार्मिक स्थळांवर कारवाई केली जात असेल, तर इतर अनधिकृत अतिक्रमणांवरही समान निकष लावले गेले पाहिजेत. प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता सर्व अतिक्रमणांवर एकसमान कारवाई करावी. “आधी हिरवे अतिक्रमण काढा, मग आम्ही आमची काढून घेऊ,” अशी भूमिका मांडत त्यांनी प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला. हिंदूंना वेठीस धरण्याचे काम प्रशासनाने करू नये. विकासकामांच्या नावाखाली एकाच समाजावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे आणि त्याची अंमलबजावणीही तितक्याच निष्पक्षपणे झाली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## जयकुमार गोरे, मोहितेंचं नाव घेत लोकं बोलले रोखठोक

सोलापूर : (स. गांवकरी)





सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेची विधान परिषद निवडणूक विविध कारणांनी आणि राजकीय घडामोडींमुळे विशेष चर्चेत आली आहे. मात्र सोलापूरच्या नागरिकांना येथे सुरू असलेल्या राजकारणाबाबत काय वाटत आहे. हे सुयश मीडिया ग्रुप ने प्रत्यक्ष जाणून घेतले स्थानिक अनेक नागरिकांना या बाबत बोलते केले अनेक नगरसेवकांशी चर्चा केले.

सध्या राज्यभर विधान परिषद निवडणुकीची चर्चा रंगली आहे. त्यामध्ये सोलापूर विधान परिषद निवडणूक विविध कारणांनी आणि राजकीय घडामोडींमुळे विशेष चर्चेत आहे. या निवडणुकीकडे पंढरपूरमधील व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी आणि विविध क्षेत्रांतील नागरिक कसे पाहतात, त्यांच्या भावना आणि अपेक्षा काय आहेत, हे जाणून घेण्याचा प्रयत्न सुयश मीडिया ग्रुप ने केला..

सर्व प्रथम पालकमंत्री जयकुमार गोरे यांना या निवडणुकीबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, आमच्या कडे संख्या बळानुसार जो आकडा आहे त्या पेक्षा ही जास्त मते मिळवून राजेंद्र राऊत निवडून येतील यात काही च शंका नाही. तर ही निवडणूक ज्यांनी लावली ते खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि त्यांचे उमेदवार देशमुख यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी आमचा विजय हा निश्चित आहे आम्ही अगदी विजयाच्या खात्रीने च ही निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. यानंतर सुयश मीडिया ग्रुप ने सोलापूर मधील जेष्ठ नागरिकांशी संवाद साधला यावेळी बोलतांना या ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले की, विधान परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येणाऱ्या प्रतिनिधींची निवडणूक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न विधान परिषदेत प्रभावीपणे मांडण्यासाठी सक्षम लोकप्रतिनिधी निवडून जाणे आवश्यक आहे. मात्र सध्या ही निवडणूक व्यक्ती आणि पक्षांभोवती फिरताना दिसत असून स्थानिक प्रश्न दुय्यम ठरत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समस्या सोडवण्यासाठी लढणारा आणि प्रश्न मांडणारा उमेदवार निवडून जाणे गरजेचे आहे. राजकीय गणिताबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सध्या भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडे संख्याबळ असल्याने महायुतीची बाजू मजबूत दिसत आहे. मात्र निवडणुकीत लोकांच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा होताना दिसत नाही. नीट परीक्षेचा प्रश्न, युवकांचे प्रश्न आणि वाढती बेरोजगारी यांसारख्या गंभीर विषयांकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दुसऱ्या एका नागरिकाने निवडणुकीचे चित्रण करताना म्हटले की, एका बाजूला पैशाची ताकद आणि दबावाचे राजकारण आहे, तर दुसऱ्या बाजूला प्रामाणिकपणाची लढाई आहे. मतदानाचा अधिकार नसला तरी हे मतदार जनतेनेच निवडून दिलेले आहेत. त्यामुळे त्यांनी संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचा विचार करून प्रामाणिक आणि लोकाभिमुख उमेदवाराला संधी द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## ओतूर येथे वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा उत्साहात

खोडद : (स. गांवकरी)



ओतूर येथे जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. परिषदेचे अध्यक्ष हरिभक्तिपरायण गंगाराम महाराज डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या मेळाव्यात वारकरी चळवळीच्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. मेळाव्यात वारकऱ्यांच्या संघटनात्मक बळकटीसह विविध धर्मप्रसार योजना, भागवत धर्माचा प्रचार-प्रसार, तसेच सामाजिक उपक्रमांबाबत विचारमंथन करण्यात आले. वारकरी समाजासमोरील प्रश्न, अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांवर उपस्थितांनी आपली मते मांडली. यावेळी पुणे जिल्हा वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब महाराज हांडे, अरुण कुऱ्हाडे ,भरत तांबे ,शिवाजी बोडके, हरिभाऊ देवकर, प्रकाश नवले ,बाळासाहेब नवले, तानाजी खराडे ,अनंतराव गटकळ, दत्ता वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. भाऊसाहेब महाराज हांडे यांनी वारकरी चळवळीच्या कार्याचा गौरव करत समाजहितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात गंगाराम महाराज डुंबरे यांनी ११ नोव्हेंबर २०११ रोजी स्थापन झालेल्या जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेच्या वाटचालीचा आढावा घेतला. वारकऱ्यांना मिळणाऱ्या मानधनासंदर्भातील प्रश्नांवर चर्चा करून भविष्यात अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. भविष्यात गरजू वारकऱ्यांसाठी अधिकाधिक लाभ मिळवून देण्याचा मानही व्यक्त केला.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

### सोलापूरच्या प्रलंबित विकास प्रश्नांवर सकारात्मक निर्णयाचे संकेत; मुख्यमंत्रींसोबतही बैठक होणार

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर शहरातील विविध प्रलंबित विकास प्रश्नांबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या ठोस आश्वासनांनंतर सोलापूर विकास मंचाने १२ जून रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आयोजित केलेले आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर १० जून रोजी रात्री उशिरापर्यंत पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूर विकास मंचाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. यावेळी मंचाच्या प्रतिनिधींनी सोलापूरच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे विषय पालकमंत्र्यांसमोर मांडले.

बैठकीत पालकमंत्री गोरे यांनी सोलापूर विमानतळावरील नियमित विमानसेवा, नाईट लँडिंग सुविधा, आयटी पार्क, परिवहन बस सेवा, पाणीपुरवठा योजना, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच इतर प्रलंबित विकासकामांबाबत केंद्र व राज्य शासनाच्या संबंधित विभागांशी समन्वय साधून सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. याशिवाय, सोलापूरच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर मुख्यमंत्री यांच्यासोबत सोलापूर विकास मंचाच्या शिष्टमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. या प्रश्नांवर शासनाला आणि प्रशासनाला आवश्यक कालावधी देण्याची विनंती पालकमंत्री गोरे यांनी मंचाकडे केली. त्यांच्या या विनंतीचा मान राखत तसेच सोलापूरच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंचाच्या वतीने देण्यात आली.

मंचाने स्पष्ट केले की, शासनाकडून अपेक्षित कालावधीत ठोस कार्यवाही झाल्यास पूर्ण सहकार्य करण्यात येईल. मात्र, विकास प्रश्नांबाबत समाधानकारक प्रगती न झाल्यास पुढील काळात आंदोलनात्मक भूमिका अधिक तीव्र करण्यात येईल. बैठकीस सोलापूर विकास मंचाचे मिलिंद भोसले, केतन शहा, योगीन गुर्जर, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, ॲड. दत्तात्रय अंबुरे, प्रा. प्रसन्न नाझरे, सुहास भोसले, आनंद पाटील आदी उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## मॅरियट इंटरनॅशनलने १०,००० हॉटेल्सचा टप्पा केला साजरा



पुणे (स. गांवकरी) : मॅरियट इंटरनॅशनल इंकने (नॅसडॅक: एमएआर, 'मॅरियट') आज जागतिक स्तरावर आपले १०,०००वे हॉटेल जेडब्ल्यू मॅरियट रणथंबोर रिसॉर्ट अँड स्पा सुरू करण्याची घोषणा केली, जे कंपनीच्या १००व्या वर्धापनदिनाकडे वाटचाल करताना एक ऐतिहासिक टप्पा दर्शवते. "मॅरियटची स्थापना ९९ वर्षांपूर्वी नऊ आसनी रूट बिअर स्टँड म्हणून झाली होती आणि आजपर्यंत १४६ देश आणि प्रदेशांमध्ये पसरलेल्या १०,००० हॉटेल्सच्या जागतिक पोर्टफोलिओमध्ये तिचे रूपांतर झाले आहे. आमच्या जागतिक टीम्स आणि मॅरियट ब्रँडवर सातत्याने विश्वास ठेवणाऱ्या मालकांमुळे शक्य झालेल्या या उल्लेखनीय टप्प्याचा मला अत्यंत अभिमान आहे," असे मॅरियट इंटरनॅशनलचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अँथनी कॅपुआनो म्हणाले. "जेडब्ल्यू मॅरियट ब्रँडचे नाव असलेल्या हॉटेलसह हे यश साजरे करणे विशेष अर्थपूर्ण आहे, कारण हे नाव आमचे सह-संस्थापक जे. विलार्ड मॅरियट यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. त्यांनी आणि ॲलिस एस. मॅरियट यांनी संधी, सेवा व नाविन्यतांचा विलक्षण वारसा तयार केला, जो पुढे नेण्याचा बहुमान आम्हाला मिळाला आहे."

## इनब्रू बेव्हरेजेसने सादर केली रोमानोव जॅझी जांभूळ मिंट व्होडका




पुणे (स. गांवकरी) : भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्होडका ब्रँडपैकी एक असलेल्या रोमानोव व्होडकाने महाराष्ट्रात रोमानोव जॅझी जांभूळ मिंट व्होडका लॉन्च करून आपल्या सर्वात धाडसी फ्लेवर इनोव्हेशनची घोषणा केली आहे. जांभळाच्या समृद्ध आणि परिचित चवीला ताजेतवाने मिंट फिनिशची जोड देणारा हा नवीन प्रकार ब्रँडच्या फ्लेवर्ड व्होडका पोर्टफोलिओमध्ये महत्त्वाची भर घालतो आणि आजच्या ग्राहकांसाठी नाविन्यपूर्ण फ्लेवर अनुभव निर्माण करण्याच्या रोमानोवच्या वचनबद्धतेला अधिक बळकटी देतो. हा लॉन्च ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडी ओळखून त्यानुसार आधुनिक आणि सुसंगत उत्पादने विकसित करण्याच्या रोमानोवच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. ग्राहक अधिक वेगळे फ्लेवर्स आणि अनोखे ड्रिंकिंग अनुभव शोधत असताना, सांस्कृतिक संदर्भ आणि आधुनिक चवींचा समतोल साधणाऱ्या मजबूत इनोव्हेशन पाइपलाइनच्या माध्यमातून रोमानोव बाजारपेठेत आघाडीवर राहण्यास कटिबद्ध आहे. या लॉन्चबाबत बोलताना इनब्रू बेव्हरेजेसचे जनरल मॅनेजर – मार्केटिंग, श्री. सुमित तिवारी म्हणाले, "रोमानोवने महाराष्ट्रात अनेक दशकांपासून व्होडका श्रेणीत नेतृत्व केले आहे आणि धाडसी, युवा आणि सांस्कृतिकदृष्ट्या जवळीक साधणाऱ्या फ्लेवर्सद्वारे ग्राहकांशी मजबूत नाते निर्माण केले आहे. जांभूळ मिंटच्या माध्यमातून आम्ही एक वेगळे फ्लेवर संयोजन सादर करत आहोत, जे परिचित चव आणि ताजेपणाचा उत्कृष्ट मिलाफ घडवून आजच्या ग्राहकांसाठी एक आधुनिक ड्रिंकिंग अनुभव तयार करते." रोमानोव जॅझी जांभूळ मिंट व्होडका आता महाराष्ट्रभर 750 मि.ली., 375 मि.ली., 180 मि.ली. आणि 90 मि.ली. या पॅक साइजमध्ये उपलब्ध आहे.




## एएम/एनएस इंडिया आणि बिट्स पिलानीच्या पुढाकारातून विकासाला चालना

नवी दिल्ली (स. गांवकरी) : जगातील आघाडीच्या दोन पोलाद उत्पादक कंपन्यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या एएम/एनएस इंडिया ने बिट्स पिलानीसोबतच्या आपल्या धोरणात्मक भागीदारीद्वारे कौशल्य विकास आणि क्षमता वृद्धीबाबतची बांधिलकी अधिक दृढ केली आहे. प्रोसेस इंजिनिअरिंगमधील बी.टेक. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर, एएम/एनएस इंडियाने मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील पहिल्या एमबीए बॅचच्या पदवीदानासह आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. दीक्षांत समारंभ गुरुवारी एएम/एनएस इंडियाच्या हजीरा येथील प्रमुख प्रकल्पात आयोजित करण्यात आला. या समारंभाला सुरतचे पोलीस आयुक्त, आयपीएस अधिकारी अनुपम सिंह गहलोत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.पोलाद क्षेत्रात कार्य-अभ्यास एकात्मिक शिक्षण स्वीकारण्यात आघाडीवर असलेल्या एएम/एनएस इंडियाने भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ विकसित करण्यासाठी वर्क इंटिग्रेटेड लर्निंग प्रोग्राम्स (डब्लूआयएलपी) चा प्रभावीपणे वापर केला आहे. बी.टेक. कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी आणि विस्तार केल्यानंतर, विविध विभागांतील नेतृत्व क्षमता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने कंपनीने मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंटमधील एमबीए कार्यक्रम सुरू केला. सध्या या कार्यक्रमाच्या अनेक बॅचेस सुरू असून, कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सातत्यपूर्ण शिक्षणाबाबत संस्थेची दृढ बांधिलकी याचे ते प्रतीक आहे.

## ॲक्सिस मॅक्स लाईफकडून २,५३० कोटींचा पार्टिसिपेटिंग बोनस जाहीर

AXIS MAX LIFE INSURANCE

पुणे (स. गांवकरी) : पूर्वी मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी पात्र पॉलिसीधारकांकरिता २,५३० कोटी रुपयांच्या सहभागी (पार्टिसिपेटिंग) बोनसची (पीएआर) घोषणा केली आहे. हा कंपनीचा सलग २४ वा वार्षिक बोनस असून, यामुळे कंपनीने गेल्या २४ वर्षांत घोषित केलेला एकूण बोनस १८,३७७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. हा जाहीर केलेला बोनस जुलै २०२६ पासून २१ लाखांहून अधिक पात्र पीएआर पॉलिसीधारकांना वितरित करण्यात येईल. ॲक्सिस मॅक्स लाईफचा पीएआर फंड आर्थिक वर्ष २०२५ मधील ७४,११९ कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ७९,००३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. गेल्या एका दशकात पीएआर फंडात १७ टक्के चक्रवाढ व्याजाने (सीएजीआर) वाढ झाली आहे. कंपनीने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, कंपनीच्या वार्षिक बोनस घोषणांमध्ये अलिकडच्या वर्षांत सातत्याने वाढ झाली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२२ मध्ये जाहीर केलेला बोनस १,४६९ कोटी रुपये होता, तो आर्थिक वर्ष २०२३ मध्ये १,६०४ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १,८२६ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कोटी रुपये आणि आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. ॲक्सिस मॅक्स लाईफने दिलेल्या माहितीनुसार, तिच्या सहभागी उत्पादनांवर रोख बोनस, रिव्हर्शनरी बोनस आणि टर्मिनल बोनस यांसारख्या विविध प्रकारच्या बोनसच्या ऑफर उपलब्ध आहेत. याशिवाय, मूळ रकमेच्या निश्चितीला धक्का न लावता बोनस संचय, जमा झालेल्या बोनसची आंशिक उचल, पेड-अप ॲडिशन्स आणि प्रीमियम ऑफसेट यांसारखे पर्यायही या उत्पादनांवर उपलब्ध आहेत.

# सोलापुरात होतेय इनडोअर शूटिंग' आणि 'हाय बजेट मानधन'

## सोलापूरच्या राजकीय चित्रपटाचा क्लायमॅक्स जवळ.... जवळ फायनल; चित्रपट २२ जूनला रिलीज होणार

सोलापूर : (स. गांवकरी)




सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा ज्वर सध्या शिगेला पोहोचला असून, सोलापूरच्या राजकीय पटलावर सध्या एखाद्या बिग बजेट 'मल्टिस्टारर' चित्रपटाची संहिता लिहिली जात असल्याचा भास होत आहे. सोशल मीडियावरील रिल्स आणि पोस्टच्या माध्यमातून दर मिनिटाला नेत्यांचे नवनवीन 'ट्रेलर्स' प्रेक्षकांच्या (मतदारांच्या) भेटीला येत आहेत. नेत्यांच्या गुप्त भेटीगाठी, पंचपक्वान्नांच्या सोबतीने रंगणाऱ्या सुबक जेवणावळी, आलिशान चारचाकी वाहनांचे फिरणारे ताफे, शुभ्र वेशभूषेतील रुबाबदार एन्ट्री, आणि मतदारांसमोर हात जोडण्याची अन् चालण्या-बोलण्याची बदलेली लयबद्ध पद्धत... हे सारे पाहून सोलापूरकर सध्या एका अदभूत आणि मनोरंजक अशा राजकीय चित्रपटाचा थरार अनुभवत आहेत. या राजकीय महासिनेमाच्या(विधानपरिषद ) निमित्तानेच होत असलेल्या शूटींग चा आस्वाद नागरिक घेत आहेत. पण त्यासोबतच भावनांचा कल्लोळ, मैत्रीचे जुने-नवे बंध, नात्यागोत्यांची गुंफण, 'डॅशिंग' संवादफेक आणि 'सस्पेन्स-थ्रिलर'चा तगडा मसाला ठासून सुरू आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण जरी संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या भूमीत होत असले, तरी यातील ७० टक्के दृश्ये ही बंद दाराआड, म्हणजेच 'इनडोअर' (घरांमध्ये आणि कार्यालयांमध्ये) चित्रित होत आहेत. त्यामुळे नेपथ्य किंवा सेट डिझाईनवर फारसा खर्च होत नसला, तरी दिग्गजांची मोठी 'स्टारकास्ट' एकत्र आणण्यासाठी आणि त्यांचे मन वळवण्यासाठी (मानधनापोटी) मात्र अफाट ऊर्जा आणि 'बजेट' खर्च होत असल्याची चर्चा (जिल्ह्यातील )चौकाचौकात रंगत आहे. या चित्रपटात सर्वच राजकीय हिरोंना नाईलाजास्तव का होईना, पण कोणती ना कोणती भूमिका वठवावी लागणार आहे. त्यामुळे आपल्या लाडक्या नेत्याला पडद्यावर नक्की कोणता 'रोल' मिळाला आहे, हे पाहण्यासाठी कार्यकर्त्यांची 'फॅन फॉलोईंग' प्रचंड उत्सुक आहे. राजकीय गणितांशी दुरान्वयेही संबंध नसलेली सोलापूरची सर्वसामान्य जनताही आता या 'पॉलिटिकल ब्लॉकबस्टर'च्या प्रदर्शनाची चातकासारखी वाट पाहत आहे. अखेर या चित्रपटाची मूळ पटकथा कुणी लिहिली होती? पडद्यामागून सूत्रे हलवणारा खरा दिग्दर्शक कोण होता? आणि हा चित्रपट कोणाला 'सुपरहिट' करणार की कोणाचा 'फ्लॉप' ठरणार? या सर्व रहस्यांचा उलगडा आगामी २२ जून रोजी चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरच (निकालानंतरच) होणार, हे मात्र निश्चित आहे

## समर्थच्या विद्यार्थ्यांची MHT-CET (PCB) परीक्षेत यशाची सुवर्णझेप

बेल्हे : (स. गांवकरी)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला यशाचे पंख लाभल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे -बांगरवाडी येथील विद्यार्थ्यांनी MHT-CET (PCB) २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्याची माहिती प्राचार्या वैशालीताई आहेर यांनी दिली. या परीक्षेत रिद्धी थिटे हिने ९७.५४ पर्सेंटाईल गुण मिळवून महाविद्यालयाच्या यशाचा झेंडा उंचावला.तिच्या पाठोपाठ वैष्णवी येवले (९५.८०), दिव्या औटी (९३.५५), आयुष वाघुले (९३.१७), ईश्वरी दाते (९२.३५), श्रुती शिंदे (९२.०७) यांनीही उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.तसेच श्रुती जोरी, ज्ञानेश्वरी जाधव,प्रतिक्षा गाडेकर, तनुजा औटी, श्रुतिका येवले, चैत्राली साळवे, नेहा हाडवळे, मिनाक्षी लामखडे, इम्रान सय्यद, अनुष्का गाजरे, श्रीराम दांगट, स्नेहल भंडलकर, वेदिका रवळे आदी विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय पर्सेंटाईल




मिळवत यशाची परंपरा कायम राखली. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांचे प्रभावी मार्गदर्शन मिळावे यासाठी समर्थ शैक्षणिक संकुल सातत्याने प्रयत्नशील आहे. इयत्ता अकरावीपासूनच विद्यार्थ्यांना MHT-CET परीक्षेची शास्त्रशुद्ध तयारी करून घेतली जाते. नियमित अध्यापन, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, विशेष सराव परीक्षा आणि विद्यार्थ्यांची अथक मेहनत यांचा हा यशस्वी संगम असल्याचे प्राचार्या सौ. वैशाली आहेर यांनी सांगितले. या यशामागे प्रा. संतोष पोटे, प्रा. राजेंद्र नवले, प्रा. विनोद चौधरी, प्रा. अमोल खामकर, प्रा. नूतन पोखरकर, प्रा. रोहिणी औटी, प्रा. सोनल बांगर आणि प्रा. वैशाली ढाकोळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## सुमारे दोन लाख भाविकांकडून माऊलींच्या पैस खांबाचे दर्शन

नेवासा : (स. गांवकरी)

अधिक पुरुषोत्तम मास पर्वकाळात आलेल्या जेष्ठ वद्य कमला एकादशीच्या निमित्ताने गुरुवारी नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील माऊलींच्या "पैस"खांबाचे दिवसभरात सुमारे दोन लाख भाविकांनी दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी "ज्ञानोबा माऊली तुकाराम" असा जयघोष करत माऊलींच्या मंदिरात हजेरी लावली. यावेळी माऊलींच्या एकादशीच्या निमित्ताने दिंड्या घेऊन आलेल्या हजारो वारकऱ्यांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त व प्रमुख वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे,रामभाऊ जगताप,विश्वासराव गडाख, भिकाजी जंगले, कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव यांनी स्वागत केले. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या वद्य एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊलीच्या "पैस"खांबास यजमानांच्या हस्ते





वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला.यावेळी आदिनाथ महाराज पांगरे,जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे, संतसेवक दामोदर पवार व भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकादशीचे औचित्य साधून माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी,संत ज्ञानेश्वर माऊली पैस खांब,भगवान दत्तात्रय,करविरेश्वर, वैकुंठवाशी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर परिसर गर्दीने गजबजून गेला होता.मंदिर परिसरात विविध दुकाने उभारण्यात आल्याने यात्रेचे स्वरूप परिसराला प्राप्त झाले होते. एकादशी निमित्त शेकडो दिंड्यांनी येथे ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोष करत हजेरी लावली वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या हस्ते आलेल्या दिंडीतील चालकांचा श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला.रात्री वद्य एकादशीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांचे हरी किर्तन झाले.कीर्तनाला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले.

## ऑफलाइन पर्यायी व्यवस्था द्या : ग्राहक पंचायत



अकोले : (स. गांवकरी)

अकोले आदिवासी तालुक्यामध्ये शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर लागू केलेल्या नव्या जीपीआर ( गव्हर्नमेंट प्रोसेस रि. इंजिनिअरींग) प्रणाली मुळे अकोले आदिवासी तालुक्यात सेतू केंद्र व महा ई. सेवा केंद्रांमध्ये सॉफ्टवेअर बंद पडत असल्यामुळे ऑफलाइन दाखल्यांना मान्यता देण्या बाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे तहसिलदार डॉ. सिध्दार्थ कुमार मोरे यांना दिल्याची माहिती जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलिक, तालुका अध्यक्ष देत्ता शेनकर, कार्याध्यक्ष महेश नवले यांनी दिली.

निवेदनात पुढे म्हटले आहे की अकोले आदिवासी तालुक्यामध्ये 'महा ऑनलाइन' चे सॉफ्टवेअर दुरुस्त होई पर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून ऑफलाइन दाखल्यांना मान्यता देण्यात यावी. अहिल्यानगर जिल्हयातील अकोले तालुका आदिवासी अति दुर्गम भौगोलिक दृष्ट्या मोठा असून अनेक गरीब विद्यार्थी पायपीट करून शिक्षण घेत आहे. 1.सर्व्हर डाऊन असणे, लॉगिन न होणे आणि कागदपत्र अपलोड न होणे अशा तांत्रिक त्रुटींची कारणे पुढे केली जात आहेत परिणामी सन २०२६ शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ११ वी प्रवेशासह पदवी व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रा अभावी प्रवेश नाकारने जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

2.महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी भरती सह विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक दाखले वेळेत मिळत नाही अधिवास व राष्ट्रीयत्व इतरही दाखल्यासाठी पडताळणी प्रक्रिया आधिक कठोर करण्यात आली आहे.

3.दाखल्या अभावी शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भिती पालक, विद्यार्थ्यांमध्ये वाढली आहे पालक विद्यार्थी मानसिक तणावाखाली आहे. वरील विषयाचा मुद्दाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा अन्यथा पालक विद्यार्थी आपणास पूर्व सूचना न देता आंदोलन,उपोषण, रास्ता रोको इत्यादी मार्गाचा अवलंब करतील याची नोंद घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, प्रा. डॉ.सुनील शिंदे, सचिव राम रुद्रे, रामदास पांडे, भाऊसाहेब वाकचौरे, कैलास तळेकर, अनंत घाणे, सुरेश गबाले, गंगाराम धिंदळे, मोहन मुंडे, गणपत थिगळे, रामदास पवार, अशोक उघडे, प्रमोद मंडलिक, रामहारी तिकांडे, बाळासाहेब बनकर, सखाराम खतोडे, दत्ता ताजणे, ज्ञानेश्वर पुंडे, जालिंदर बोडके, भाऊसाहेब गोरडे, माधवराव तिटमे, प्रकाश कोरडे, राजेंद्र लहामगे,आदींचे नावे आहे. निवेदनाच्या प्रती ना.आशिष शेलार माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री महाराष्ट्र राज्य,मा.निवासी उपजिल्हाधिकारी तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्री व सचिवालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, मा. जिल्हाधिकारी साहेब अहिल्यानगर यांना पत्र मेल ई-मेल द्वारे पाठवण्यात आल्या आहे.

## पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे व्यापक नियोजन पूर्ण

ठाणे : (स. गांवकरी)

- १,९७,६९४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्याचे उद्दिष्ट
- १,८७८ लसीकरण बूथ, १,३४७ घरभेट पथके सज्ज

देशाला पोलिओमुक्त ठेवण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला बळकटी देण्यासाठी २८ जून, २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी ठाणे जिल्ह्यात व्यापक सूक्ष्म नियोजन (Micro Plan) पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयातून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक पात्र बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लस पोहोचविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील सुमारे १ लाख ९७ हजार ६९४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचा डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी ग्रामीण व शहरी भागात मिळून १ हजार ८७८ लसीकरण बूथ उभारण्यात येणार असून, त्यावर कार्य करण्यासाठी ४ हजार ३४८ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. बूथच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी ३७४ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. लसीकरणापासून एकही बालक वंचित राहू नये यासाठी विशेष घरभेट मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अंदाजे ६ लाख ६९ हजार ७७३ घरांना भेटी देण्यासाठी १ हजार ३४७ पथके कार्यरत राहणार असून, या कामासाठी एकूण ५ हजार ३२३ पथक-दिवसांचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २६३ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले असून, त्यांचे एकूण १ हजार ३६ पर्यवेक्षक-दिवस नियोजित करण्यात आले आहेत.

# शिक्षण केवळ नोकरीसाठी नव्हे, तर संस्कारांसाठीही असले पाहिजे

## पद्मश्री पोपटराव पवार : राळेगणमध्ये राज्यस्तरीय शिक्षण हक्क परिषद व राज्यस्तरीय महामंडळ सभा

पारनेर : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संस्कार व जीवन जगण्यासाठीची कला मिळत आहे. परंतु नव्या शैक्षणिक धोरणानुसार अनेक प्राथमिक शाळांचे भवितव्य अंधकारमय आहे. त्यामुळे गावागावांतील जिल्हा परिषद शाळा टिकल्या तर गावचे गावपण, संस्कार व संस्कृती टिकणार असल्याचे मत पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांचे व संघटना पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे तसेच शिक्षण व ग्रामविकास



सचिवांची संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन पद्मश्री पोपटराव पवार यांनी दिले. राळेगणसिद्धी येथील महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने राज्यस्तरीय भव्य शिक्षण हक्क परिषद व राज्यस्तरीय महामंडळ सभेचे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे नेते संभाजीराव थोरात व राज्य संघाचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्यासह राज्य संघाचे उपनेते रावसाहेब रोहोकले, राष्ट्रीय शिक्षक महासंघाचे नेते बाळासाहेब झावरे, राष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष आबासाहेब जगताप, जिल्हाध्यक्ष प्रविण ठुबे, राजेश हिवाळे, बाळकृष्ण तांबारे, मच्छिंद्रनाथ मोरे, किशन इदगे, सचिन डिंबळे, स्वाती शिंदे, शिक्षक नेते डॉ. संजय कळमकर, संजय शेळके, रामराव निकम, रावसाहेब सुंबे, बळवंत पाटील, राजकुमार साळवे, जिल्हाध्यक्ष सुरेश निवडुंगे, शिक्षक बँक संचालक सूर्यकांत काळे, तालुका नेते सुनील दुधाडे, तालुकाध्यक्ष युवराज हिलाळ, मंडळ तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर इंगळे, रघुनाथ झावरे आदी पदाधिकारी व शिक्षक सभासद उपस्थित होते. यावेळी आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पवार म्हणाले की, शिक्षण हे उद्याच्या राष्ट्राचे भवितव्य आहे. त्यामुळे संघटना पातळीवरील फंदात आम्ही कधी पडलो नाही. परंतु शिक्षकांच्या शासन पातळीवरील टीईटी, संचमान्यता, पदोन्नती, बीएलओ कामे, ऑनलाइन कामे या प्रलंबित प्रश्नांसाठी व न्यायलढ्यासाठी प्रयत्न करणार आहोत. दिवसेंदिवस परिस्थिती बिघडत चालली आहे. गाव आणि संस्कार-संस्कृती बदलत चालली आहे. त्यामुळे गावच्या जडणघडणीत गुरूजी व शिक्षकांचा प्रभाव होता, तो आता कमी झाला आहे. शिक्षण व्यवस्थेत सामाजिक व जीवनविषयक समस्या अभ्यासक्रमात आल्या तर जीवन जगण्यासाठी कला मिळू शकते. त्यामुळे केवळ आर्थिक पॅकेजसाठी शिक्षण व अभ्यासक्रम सध्या चालू असल्याची खंत पोपटराव पवार यांनी व्यक्त केली. गावात व अनुभवातून शिकायला मिळाले पाहिजे. पर्यावरणाची लढाई लढली जात आहे. पाणी व पर्यावरण याऐवजी आर्थिक भविष्य ज्यात आहे त्या अभ्यासक्रमाची निवड करण्यात येत आहे. एकीकडे वादळ तर दुसरीकडे पाणीटंचाई अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परंतु राळेगणसिद्धी व हिवरे बाजार ही शिक्षकांच्या योगदानामुळे उभी राहिली आहेत. मात्र काळानुसार आता शिक्षणपद्धती बदलत चालली आहे. नाशिक पोलिस अकादमीतील ९० टक्के मुले प्राथमिक शाळेतील विद्यार्थी होते, तर मसुरी येथील आयएएस अकादमीतही प्राथमिक शाळेतील विद्यार्थी होते.